

**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०





साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १५ | बुधवार,दि.२२ मार्च २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


# प्रशिक्षणार्थी विमानाला अपघात, दोन पायलट ठार





### दोघांचेही मृतदेह कुटुबियांना सोपवले

**प्रशिक्षणार्थी विमान अपघातात मृत पावलेल्या दोन्ही पायलटचे मृतदेह त्यांच्या कुटुबियांना सोपवण्यात आले.दरम्यान घटनास्थळाची पाहणी करण्याकरीता व ब्लकबॉक्सच्या तपासणीकरीता डीजीसीएची चमू आल्याची माहिती बालाघाटचे पोलीस अधिक्षक समीर सौरभ यांनी बेरार टाईम्सशी बोलतांना दिली.**

### पायलट हिमाचल प्रदेश आणि गुजरातचे

**विमानात प्रशिक्षक पायलट मोहित कौशल ठाकूर वय-२४ बनीखेत जिल्हा.चंबा,हिमाचल प्रदेश येथील आहे.मोहीतचे वडील हे इंजिनियर तर आई शासकीय नोकरीत आहे. आणि महिला ट्रेनी पायलट वृषांका माहेश्वरी वय-१९ रा.कच्छ.गुजरात या होत्या.**



## प्रशिक्षू विमानाच्या अपघातस्थळी पोचले तपासणी पथक,मात्र ब्लक बाक्स सापडेना

**गोंदिया:–** शेजारील मध्यप्रदेश राज्यातील बालाघाट जिल्ह्यातील किरणापूरच्या भक्कुटोला जंगलात झालेल्या प्रशिक्षणार्थी विमानाच्या अपघाताची चौकशी करण्यासाठी मुंबईहून आलेल्या तीन सदस्यीय तपास पथकाने सोमवारी घटनास्थळी पोहोचून घटनेबाबत पुरावे आणि माहिती गोळा केली आहे.मात्र या पथकाला विमानाचा ब्लक बाँक्स न मिळाल्याने चौकशीकरीता आपल्या ताब्यात घेता आलेला नाही.सदर तीन सदस्यीय तपासणी पथक अजूनही गोंदियात तळ ठोकून आहे.

गोंदियाच्या बिरसी विमानतळावरील इंदिरा गांधी राष्ट्रीय उड्डान अकादमी (इगुआ) रायबरेली केंद्रातील प्रशिक्षणार्थी क्रॉफ्टचा शनिवारी झालेल्या अपघातानंतर त्या अपघाताच्या चौकशीकरीता डीजीसीएची चमू तब्बल २२ तासानंतर गोंदियाच्या बिरसी विमानतळावर रविवारला दुपारी ३ वाजता दाखल झाली.या डीजीसीएच्या चमूने बिरसी विमानतळावरील इगुआच्या प्रशिक्षण केंद्र व्यवस्थापकासोबतच इतर पायलट यांच्याशी व तांत्रिक विभागाच्या कर्मचारी वर्गासोबत चर्चा केली.

सदर घटनास्थळ हे अतिनक्षलसवेंदनशिल असल्याने मध्यप्रदेश पोलिसांच्या हॉंक फोर्स व स्थानिक पोलिसांच्या कोंबीग ऑफरेशननंतर घटनास्थळापर्यत पोलीस पोचून प्रशिक्षणाथी पायलट यांचे मृतदेह ताब्यात घेत लांजी येथील ग्रामीण रुग्णालयात उत्तरीय तपासणीकरीता हलविले आहे.

प्रशिक्षकासह प्रशिक्षणार्थी घेवून दुपारच्या सुमारास उड्डाण भरलेल्या क्रॉफ्ट शनिवारला दुपारी तीन वाजेच्या सुमारास मध्यप्रदेशातील किरणापूर जंगलातील भक्कुटोला जंगलात कोसळले. यात प्रशिक्षासह प्रशिक्षणार्थिचा देखील मृत्यू झाला होता. या अपघातात प्रशिक्षक पायलट मोहित ठाकूर आणि महिला प्रशिक्षणार्थी वैमानिक व्ही. माहेश्वरी यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.प्रशिक्षक मोहित ठाकूर यांचा मृतदेह खडकांमध्ये पूर्णपणे जळालेल्या अवस्थेत आढळून आला. तर महिला प्रशिक्षणार्थीचा मृतदेह विमानातच अडकला होता.

### १३ वर्षांत घडले पाच अपघात...

**बिरसी येथील राजीव गांधी विमान प्रशिक्षण केंद्रातील विमानांचा अपघात किंवा प्रशिक्षणार्थ्यांचा मृत्यू अशी पाच प्रकरणे १३ वर्षांत घडली आहेत. २०१० मध्ये विमानतळावरून उडालेले विमान मध्य प्रदेशातील लांजी येथे इमर्जन्सी लँडिंगच्या माध्यमातून उतरविण्यात आले होते. प्रशिक्षणाथी विमान पूर्णत: क्षतिग्रस्त झाले होते. १८ मार्च २०१३ रोजी प्रशिक्षणाथी विमान थेट रनवेबाहेर येऊन एका वाहनात शिरले होते. २४ डिसेंबर २०१३ रोजी रायबरेली येथील प्रशिक्षणाथी विमानाचा (डायमंड ४०) मध्य प्रदेशातील पचमढी परिसरात अपघात होऊन सोहेल अन्सारी या पायलटचा मृत्यू झाला होता. मार्च २०१७ मध्ये दोन प्रशिक्षणार्थींचा आकस्मिक मृत्यू झाल्याचे प्रकरण समोर आले होते. २६ एप्रिल २०१७ रोजी देवरी गावाजवळील वैनगंगा नदी परिसरात डीए ४२ क्रमांकाचे हे चार आसनी विमान डायमंड कंपनीच्या विमानाचा अपघात झाला होता. यात वरिष्ठ प्रशिक्षक रंजन आर. गुप्ता (४५) व प्रशिक्षणाथी हिमानी गुरुदयाल सिंग कल्याणी (२४, रा. दिल्ली) यांचा मृत्यू झाला होता.**

वास्तविक, AAIB हे DGCA चे स्वतंत्र बोर्ड आहे, जे विमान अपघातांची चौकशी करते. डायरेक्टर जनरल सिव्हिल एव्हिएशन (DGCA) मुंबई यांच्या टीमने मध्यप्रदेशातील भुक्कुटोलाच्या पहाडी भागात १०० फूट खोल पहाडात विखुरलेल्या विमानाच्या अवशेषाची पाहणी केली.तसेच त्या अपघातस्थळावरुन जे आवश्यक उपकरणे, रीडिंग बॉक्स, कॉकपिटमधील सिग्नल यासारखी काही माहिती गोळा करण्याचा प्रयत्न केला असला तरी विमानाचा बहुतांश भाग जळाल्याने तपासणी पथकाला चौकशीकरीता आवश्यक तांत्रिक साहित्याची जुळवाजुळव करताना अडचणी आल्याचे वृत्त आहे.या तपासाचा अहवाल तपासणी पथक मुंबईला परत गेल्यानंतर दिल्ली येथील मुख्यालयाला सादर करणार असल्याने यास किती दिवस लागतील याबाबत नेमका अंदाज वर्तविणे शक्य नसल्याचे बिरसी विमानतळाचे व्यवस्थापक शफिक शाह यांनी सांगितले.


तपासणी टीम घटनास्थळी पोहोचली आहे आणि विमानाच्या उड्डाणाची दिशा, अपघातापुर्वी त्याचा वेग, झाड किंवा खडकावर आदळल्याचा आघात इत्यादींचे मूल्यांकन केले आहे. वाचन बॉक्स, सुरक्षित असल्यास, प्रशिक्षणार्थी विमानाच्या शेवटच्या क्षणी वेगाची माहिती असेल. डेटा रेकॉर्डर जमा केले गेले आहेत.त्यांनी सांगितले की, कागदपत्रे, घटनास्थळी असलेले पुरावे आणि ब्लॅक बॉक्समधील वैमानिक आणि प्रशिक्षणार्थी वैमानिक यांच्यातील संभाषणाची सविस्तर तपासणी केल्यानंतरच अपघाताची कारणे स्पष्ट होणार आहेत.अशी माहिती देण्यात आली. डीजीसीए किंवा एएआयबीच्या तपासानंतर हा अहवाल नागरी विमान वाहतूक मंत्रालयाला पाठवला जाईल.

अपघातग्रस्त विमान हे सिंगल इंजिन ऊ-४१ ट्रेनी विमान असल्याचे सांगण्यात येत आहे. सिंगल इंजिनाव्यतिरिक्त गोंदिया विमानतळावर दुहेरी इंजिन असलेले ऊ-४२ प्रशिक्षणाथी विमानही आहे. दरवषी १०० हून अधिक प्रशिक्षणाथी वैमानिक गोंदिया विमानतळावर प्रशिक्षण घेतात. यानंतर उत्तर प्रदेशातील अमेठी येथील इंदिरा गांधी नॅशनल फ्लाइंग अकादमीची टीमही या घटनेची चौकशी करण्यासाठी पोहोचणार आहे.

## चंद्रपूर,गडचिरोली जिल्ह्यासह तेलंगणा राज्यात भूकंपाचे धक्के;३.१ रिष्टर स्केल तीव्रता

**चंद्रपूर:** जिल्ह्यातील गोंडपिंपरी तालुका तसेच गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील महागाव (बु.) येथे भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याची माहिती आहे. तेलंगणा राज्यातही काही भागांना भूकंपाचे सौम्य धक्के बसले आहेत. भूकंपाची तीव्रता ३.१ रिष्टर स्केल होती.

जमिनीच्या ५ किमी आत हे धक्के बसल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.गोदावरी फॉल्ट परिसर हा भूकंपप्रवण भाग असल्याचे सांगितले जात आहे. मंगळवार, २१ मार्च रोजी सकाळी ८.४२ वाजता तेलंगणा राज्यातील



कागझनगरजवळील देहेगाव भागात हे भूकंपाचे धक्के जाणवले. यानंतर चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी तालुक्यात आणि गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुक्यातील महागाव येथेही भूकंपाचे धक्के जाणवले, अशी माहिती अभ्यासकांनी दिली. यासंदर्भात जिल्हाधिकारी विनय गोडा यांना विचारणा केली असता जिल्हा प्रशासनाकडे अजून तशी माहिती नाही. माहिती घेण्याचे काम सुरूअसल्याचे त्यांनी सांगितले.

## अव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी आता जात पडताळणी प्रमाणपत्र अनिवार्य– आदिवासी विकास मंत्री डॉ.गावित

**मुंबई:** आतापर्यंत फक्त व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी जात पडताळणी प्रमाणपत्र आवश्यक होते, येणाऱ्या काळात अव्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठीही जात प्रमाणपत्र पडताळणी अनिवार्य करण्यात येणार असल्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले.

विधानसभा सदस्य डॉ. किरण लहामटे, नाना पटोले, संजय सावकारे, धर्मराव बाबा आत्राम यांनी जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे बोगस आदिवासी उमेदवार यांनी जागा बळकावणे याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती.

मंत्री डॉ. गावित म्हणाले की, जात प्रमाणपत्र निर्गमित करणे आणि त्याची पडताळणी करणे याबाबतची काही नियमावली आहे. त्यानुसारच राज्यातील मागास प्रवर्गातील जाती आणि जमातींना प्रमाणपत्र देण्यात येते तसेच या प्रमाणपत्राची पडताळणी करण्यात येते. सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत होणाऱ्या प्रवेशांना जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असते. येणाऱ्या काळात अव्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीही जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक करण्यात येणार आहे. गेल्या काही दिवसांमध्ये जात वैधता समित्यांची संख्या सातने वाढविण्यात आली असून आता राज्यात १५ जात वैधता समित्या आहेत. येणाऱ्या काळात जात पडताळणी आणि जात प्रमाणपत्रासंदर्भातील कार्यवाही सुटसुटीत होण्यासाठी नवीन प्रणाली आणण्याचा अभ्यास करण्यात येईल.

**जातीचे दाखले वेळेत देण्यासाठी नियम करणार**

शिक्षण आणि नोकरीसाठी आरक्षण मागणाऱ्यांना संबंधित उमेदवारांना जातीचे दाखले आवश्यक असतात. हे दाखले वेळेत देण्यासाठी नियम करण्यात येतील, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले.

विधानसभा सदस्य धर्मराव बाबा आत्राम, डॉ. किरण लहामटे, अशोक पवार, नाना पटोले, सुनील भुसारा, डॉ. देवराव होळी यांनी आदिम जनजाती समाज शासनाच्या सेवांपासून वंचित राहण्याबाबतची लक्षवेधी सूचना मांडली होती.

मंत्री डॉ. गावीत म्हणाले की, राज्यातील तीन आदिम जमातींसाठी मुंबई विद्यापीठाकडून सर्वेक्षण करण्यात आले आहे. गावांगावांमध्ये कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी ग्रामसखीची नियुक्ती करण्यात आली आहे. ग्रामसखीमार्फत कागदपत्रे देताना त्या त्या कागदपत्रातील त्रुटी दूर करुन काम करण्यात येत आहे. पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात महाराजस्व अभियानाअंतर्गत १ जानेवारी २०२१ ते २८ फेब्रुवारी २०२३ या काळात ३५ ठिकाणी शिबीरे घेण्यात आली. यावेळी आदिम जमातीच्या लाभार्थींना विविध दाखले देण्यात आले. यामध्ये आधार कार्ड ५३९, जॉब कार्ड ७४, उत्पन्न प्रमाणपत्र ७४,रेशनकार्ड ११२, जात प्रमाणपत्र १०८ असे एकूण ९०७ दाखले आणि प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

आदिवासी समुदायांच्या रहिवासाचा प्रश्न सोडविण्यासाठी शबरी घरकुल योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत जमीन घेण्यासाठी ५० हजार रुपये देण्यात येतात, यामध्ये आवश्यक असल्यास अधिक पैसे वाढवून देण्यात येतील. तसेच आदिम जमाती विकास धोरण निश्चित करण्यात येत असल्याचे डॉ. गावित यांनी सांगितले.

## जागतिक जलदिनी ग्रामसभेत हर घर जल व ओडीएफ प्लस घोषित करण्याचा ठराव घ्या

**गोंदिया–**जागतिक जल दिन २०२३ निमित्त बुधवार २२ मार्च रोजी जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतीमध्ये जल जीवन मिशनचे काम पूर्ण झाले असल्यास गाव हर घर जल घोषित करणे तसेच शाश्वत स्वच्छतेसाठी हागणदारी मुक्त अधिक (ओडीएफ प्लस) च्या निकषाची पूर्तता केल्यास ग्रामसभा घेऊन बैठकीत ठराव करण्याच्या सूचना दिल्या असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंड यांनी दिली.

जल जीवन मिशन या योजनेच्या निकषानुसार गावातील सर्व घरांना कार्यात्मक घरगुती नळ जोडणी तसेच शाळा, अंगणवाडी, सार्वजनिक संस्थांना नळ जोडणीद्वारे पिण्याच्या शुद्ध पाण्याचा पुरवठा नियमित करणे आवश्यक आहे.त्यानुसार गावात ग्रामसभेत बैठक घेऊन २२ मार्च जागतिक जलदिनी हर घर जल ची तसेच गावात हागणदारीमुक्त अधिक (ओडीएफ प्लस ) निकषांतर्गत गावातील सर्व कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालय, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबरधन, मैला गाळ व्यवस्थापन, प्लास्टिक कचरा व्यवस्थापन या निकषाची पूर्तता केल्यास गावात ग्रामसभेत बैठक घेऊन ठराव पारित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.



जिल्ह्यात तालुका व ग्रामपंचायत स्तरावर ग्रामीण भागामध्ये पाण्याचे महत्व, वापर हाताळणी व पाण्याची बचत आदी याबाबत जनजागृती व्हावी या करीता दरवर्षी जागतिक जलदिन साजरा करण्यात येतो.दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी बुधवार दि.२२ मार्च २०२३ रोजी सर्व तालुका व ग्रामपंचायत स्तरावर जागतिक जलदिनानिमित्त जल जागृती करावयाची आहे.या जागतिक जलदिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत स्तरावर शालेय विद्यार्थ्यांची जल व स्वच्छता प्रभात फेरी, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व ग्रामस्थांच्या सहकार्याने गावातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची परिसर स्वच्छता स्त्रोतांचे क्लोरिनेशन, प्रात्यक्षिक दाखवणे, पाण्याच्या टाकीची स्वच्छता करणे, जल जीवन मिशन अंतर्गत गावातील घरोघरी नळाद्वारे प्रतिव्यक्ती, प्रतिदिन ५५ लिटर पिण्याचे शुध्द पाणी मिळेल यादृष्टीकोनातून ग्रामस्थांच्या सहकार्याने नियोजन करणे. शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायतमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे तसेच पिण्याच्या पाण्याची जागेची स्वच्छता करणे, पाऊस पाणी संकलन तसेच पाण्याचा साठा वाढविण्यासाठी गाव परिसरात पावसाचे पाणी अडवून जमिनीत जिरविणे याबाबत प्रभावीपणे जनजागृती करण्यात येऊन जलप्रतिज्ञा घेण्यात यावी असेही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले.

राज्य स्तरावरील मार्गदर्शक सुचनेनुसार जागतिक जलदिनी गावात ग्रामसभेत घेऊन जल जीवन मिशन अंतर्गत काम पूर्ण झालेल्या गावांनी हर घर जल ची घोषणा तसेच हागणदारी मुक्त अधिकची (ओडिएफ प्लस) निकषाची पूर्तता केलेल्या गावांनी हागणदारीमुक्त अधिक गाव घोषित करण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता ) नरेश भांडारकर , ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुमित बेलपत्रे यांनी केले आहे.

## आमगावासीयांचे नगर परिषदेकरिता उपोषण आंदोलन सुरु




**आमगाव:–** आमगाव नगरपरिषदेचा विषय शासनाद्वारे सवीच्य न्यायालयात प्रलंबित आहे. त्यामुळे नगर परिषदेत समाविष्ठ आठ गावांचा विकास रखडला.आपल्या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याकरिता व मागणी मान्य करुन घेण्यासाठी नगर परिषद संघर्ष समितीच्या वतीने २१ मार्चपासून तहसील कार्यालयासमोर अनिश्चितकालीन साखळी उपोषण आंदोलनाला सुरवात करण्यात आली आहे.

आमगाव नगर परिषदेत प्रशासक राज सुरु असून नगरपरिषदेत आमगाव, बनगाव, किडंगीपार, म्हाली, पद्मपूर, कुंभारटोली, बिरसी, रिसामा हे आठ गावे समाविष्ट आहे. या गावांतील नागरिक केंद्र व राज्य सरकारच्या योजनांपासून वंचित आहेत. नागरिकांना घरकूल, राष्ट्रीय रोजगार हमीच्या कामापासून वंचित व्हावे लागले,आर्थिक अडचणीत रोजगार उपलब्ध नसल्याने नागरिक हताश होऊन गेली आहेत. वाढीव लोकसंख्या प्रमाणात नवीन योजना नसल्याने पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. गलिच्छ वस्त्या, गटारे यांची वाढती समस्यांनी नागरिकांची डोकेदुखी ठरत आहे.

सन २०१४ नंतर या ठिकाणी सार्वत्रिक निवडणूक झाली नाही. लोकप्रतिनिधी निवडणूक झाली नसल्याने व योजना विकास निधी मंजूर करण्यात आले नाही . त्यामुळे या भागाचा विकास झाला नाही. या विषयाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी व न्याय द्यावा, यासाठी वेळो वेळी शासन व प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात आला. मात्र केवळ वेळ काढू धोरण होत असल्याने आपल्या मागण्यांसाठी या आठ गावातील संतप्त नागरिकांनी आपल्याला मध्यप्रदेश राज्यात विलीनीकरण करण्याच्या मागणीकरिता मुंडन मोर्चा, जनआक्रोश मोर्चा काढला. परंतु या आंदोलनाची शासनाने दखल घेतली नाही. त्यामुळे संतप्त नागरिकांनी २१ मार्चपासून मागणी मान्य होत नाही तोपर्यंत अनिचित्कालीन उपोषण सुरु केले आहे.यावेळी जगदीश शर्मा, रवी क्षीरसागर, यशवंत मानकर,संजय बहेकार,उत्तम नंदेंस्वर,सुभाष आकरे,अजय खेताण,रामेश्वर श्यामसुंदर, पिंकेश शेंडे,मंगरू अंबुले,प्रा.व्ही.डी. मेश्राम ,महेश उके, युवराज उपराडे,सुनंदा येरणे,जयश्री पुंडकर, दिलीप टेंभरे,आनंद भावे,योगेश रामटेके,घनश्याम मेंढे,समीर खान,उमेश चतुर्वेदी, गुणवंत बिसेन,ए. डी. मुरकुटे,रामकीशन शिवणकर,राजकुमार चुटे,राजेश मानकर,राधाकिशन चुटे,राजेश मेश्राम,रवी अग्रवाल,गंगाराम येळे, वामन कावळे,रितेश अग्रवाल, सुनील बडोले,मनोज सोमवंशी, विठ्ठलराव डोये यांनी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्रा चे पूजन करून साखळी उपोषण सुरूकेले. यावेळी नागरिक उपस्थित होते.

## कृषी विभाग म्हणतो अवकाळीने ८० हेक्टर पिकांचे नुकसान



### प्राथमिक अहवाल: संपामुळे पंचनामे लांबणीवर, दोन दिवस बसला गारपिटीचा फटका

**गोंदिया:** जिल्ह्यात शनिवार आणि रविवारी वादळी वारा व गारपिटीसह झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील धानपिकांसह गहू, हरभरा, मोहरी व भाजीपाला पिकाला फटका बसला. अवकाळी पावसामुळे शेकडो हेक्टरमधील पिके बाधित झाल्याची ओरड आहे. मात्र, कृषी विभागाने विभागीय आयुक्तांना पाठविलेल्या अहवालात प्राथमिक अंदाजानुसार जिल्ह्यातील ८० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याचे कळविले आहे. त्यामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मागील वर्षी जिल्ह्यात समाधाकारक पाऊस झाल्याने सिंचन प्रकल्पांमध्ये पुरेसा पाणीसाठा आहे. त्यामुळे खरीप हंगामानंतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रब्बीची मोठ्या प्रमाणावर लागवड केली. यंदा प्रथमच खरीप हंगामातील लागवड क्षेत्र ५८ हजार हेक्टरवर गेले आहे. सर्वाधिक क्षेत्र धानाचे आहे. तर गहू १३९८.३० हेक्टर, हरभरा ६४४१.५०, लाख–लाखोळी ५५३४.४०, जवस १६७१.१०, मोहरी १५००.३४, भाजीपाला १२७७.७५ हेक्टरवर लागवड करण्यात आली. हवामान विभागाने जिल्ह्यात १७ ते १९ मार्चदरम्यान गारपिटीसह अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता. तो अंदाज खरा ठरला आहे. जिल्ह्यात शनिवारी आणि रविवारी झालेल्या वादळी पाऊस व गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणात रब्बी पिकांचे नुकसान झाले. गहू, हरभरा या पिकांची काढणी सुरु असताना अवकाळी पावसाने झोडपल्याने शेतकऱ्यांच्या तोंडाचा घास हिरावला आहे. अवकाळीमुळे शेकडो हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याची ओरड शेतकऱ्यांकडून होत आहे. प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन अंतिम अहवालाता नेमके किती क्षेत्र वाढते याकडे लक्ष आहे.

### केवळ दोन तालुक्यात नुकसान

**कृषी विभागाने शासनाला पाठविलेल्या अहवाल केवळ अर्जुनी–मोरगाव तालुक्यात ७९ हेक्टर आणि सडक अर्जुनी तालुक्यात १ हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल पाठविला आहे. मात्र अवकाळी पावसाचा सर्वाधिक फटका हा तिरोडा, गोंदिया तालुक्याला बसला असताना या तालुक्यांमध्ये शुन्य नुकसाान दाखविण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.**

### संपामुळे पंचनामे लांबणीवर

**जुन्या पेन्शनच्या मागणीला घेऊन कर्मचारी संपावर गेले आहेत. त्यामुळे अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे होण्यास विलंब होत असून याचा शेतकऱ्यांना फटका बसण्याची शक्यता आहे.**

### अंतिम अहवालाकडे लक्ष

**जिल्ह्यात शनिवार आणि रविवारी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे गहू, हरभरा पिकांचे नुकसान झाले. तर गारपिटीचा भाजीपाला आणि फळबागांना मोठ्या प्रमाणात फटका बसला. यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे बोलले जाते. पण कृषी विभागाच्या अंतिम अहवालात नेमके काय जाते, त्यावर नुकसान भरपाई मिळण्याची शक्यता आहे.**

## दुकानातील सामान व बोर्ड पुन्हा रस्त्यावर

**गोंदिया:** बाजारात दुकानदारांकडून दुकानातील सामान व बोर्ड रस्त्यावर मांडले जात असल्याने नागरिकांना वाहन ठेवण्यास अडचण होते. येथूनच वाहतुकीची डोकेदुखी सुरु होत असल्याने नगर परिषद व वाहतूक नियंत्रण शाखेने मोहीम छेडली होती. मात्र, या मोहिमेला खंड पडताच दुकानदारांकडून पुन्हा दुकानातील सामान व बोर्ड रस्त्यावर आल्याचे दिसत आहे.

बाजारातील रस्ते अगोदरच अरुंद आहेत. त्यात दुकानदार आपल्या दुकानातील सामान व बोर्ड रस्त्यावर आणून ठेवतात. यामुळे नागरिकांना वाहन ठेवताना अडचण होते. परिणामी नागरिक खरेदीसाठी आले तर, रस्त्यावरच वाहन ठेऊन मोकळे होतात. येथूनच वाहतूक व्यवस्था विस्कळीत होते व जागोजागी ट्रॉफिक जामची समस्या उद्‌भवते. यामुळे नागरिकांना विनाकारण डोकेदुखी




व त्रास सहन करावा लागतो. त्यादरम्यान, नगर परिषदेचे पथक किंवा वाहतूक पोलीस दिसल्यास दुकानदार तेवढ्यापुरते सामान व बोर्ड उचलून आत नेतात. मात्र त्यानंतर चित्र होते तेच दिसून येते. आता मोहिमेला खंड पडला आहे. परिणामी दुकानदारांचे सामान व बोर्ड पुन्हा रस्त्यावर आल्याचे दिसत आहे.

**आता थेट जप्तीची कारवाई**

नगर परिषद म्हणा की, वाहतूक नियंत्रण शाखा दोन्ही विभागांकडे मनुष्यबळ कमी असल्याने आहे तेढक्या मनुष्यबळात ते काम करुन घेत आहेत. त्यात होळीचा सण होता व अशात नागरिक व दुकानदारांनाही त्रास आणि त्यांचे नुकसान नको म्हणून या मोहिमेला खंड पडला. मात्र दुकानदारांनी त्याचा गैरफायदा घेत सामान व बोर्ड रस्त्यावर ठेवणे सुरु केले आहे. अशात आता मोहीम राबविल्यास मात्र काहीही न सांगता थेट जप्तीची कारवाई होणे गरजेचे आहे.

## संपादकीय

# मी नदी बोलतेय..!

आज २२ मार्च जागतिक जल दिनः. म्हटलं बोलावं आपल्या लेकरांशीः. तुम्ही माझ्याकडे पहात नसला तरी माझ्या दोन्ही तटावर वाढताना, अंगाखांद्यावर खेळताना तुम्हाला आणि तुमच्या पूर्वजांनाही मी पाहिलंय, त्याचा आनंदही वेळोवळी घेतलाय. म्हणून तुम्ही विसरलात तरी मला तुमच्यापासून दूर कसं होता येईल? म्हणून म्हटलं बोलावंःकाय, मी कोण असे विचारता? तेच तर माझं दुःख आहेः. जवळ असूनही तुम्ही दूर आहातः. असू देतः. तर मी आहे तुमची नदी!

आज मला नदी म्हणतानाही तुम्हाला लाज वाटते. ही अवस्था कोणामुळे झाली हा विचार तरी केलाय? पूर्वी स्वच्छ व निर्मळ प्रवाह मिरवताना, स्वच्छंदीपणे वाहताना एक वेगळाच आनंद होता. त्यातून तुम्हालाही आनंद मिळायचा. लहान मुले माझ्या प्रवाहात डुंबण्यासाठी यायची. गुर-ढोरे तहान भागवायची. तहानलेला शेतकरी राजा माझी जलधार ओंजळीत घेऊन ओठाला लावायचा तेव्हा काय सुख व्हायचं सांगूः!

कपडे धुण्यासाठी बाया-पोरी यायच्या त्याचंही कधी वाईट वाटलं नाही मला. सगळी घाण पोटात घेवून मी गावागावातून जात अनेकांचे पोषण केले, तहान भागवली, शेत फुलविले. किनाऱ्यावर असलेल्या तीर्थक्षेत्री भरलेला भाविकांचा मेळा किंवा गावाची यात्रा पाहताना डोळ्याचं पारणं फिटायचं. भाविकही श्रद्धेने पावन होण्यासाठी माझ्या भेटीला यायचे तेव्हा देव भेटल्याचा आनंद मलाही व्हायचा.

काळ बदलला, माझं पाणी नवजीवन देणारं असल्याने किनाऱ्यावर वस्ती वाढू लागली. गावाचं शहर झालं, लोकसंख्या वाढली, व्यवसाय-उद्योग सगळं वाढलं. माझं पात्र मात्र आकुंचित झालं. माझा प्रवाह गरजेपोटी ठिकठिकाणी रोखला जाऊ लागला. तरीही माझी तक्रार नव्हतीच. शेवटी माझं वाहणं तुमच्यासाठीच होतं. पण शहरीकरणानंतर माझ्या प्रवाहात सांडपाणी, कचरा टाकला जाऊ लागला तेव्हा माझ्या डोळ्यात अश्रू उभे राहिले. प्लास्टिक, पुजा साहित्य, खाद्यपदार्थ, कपडे, काचेच्या बाटल्या सर्व माझ्या पात्रात टाकलंत! दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत गेलं.

सिंचनासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी मला अडवले गेले तरीही पुढच्या गावांना तृप्त करण्यासाठी मी थांबले नाही. माणूस जेव्हा स्वार्थाने माझ्या पात्रातही स्वतःचा हक्क सांगतो तेव्हा खूप दुःख होते. पावसाळ्यात निसर्गापुढे माझेही चालत नाही आणि माझ्या वेगवान प्रवाहात जेव्हा अशांची वाताहत होते तेव्हा किती वाईट वाटतं कोणाला सांगू? निसर्गावर तुम्ही आक्रमण करूशकतात, मी मात्र निसर्ग नियमांशीच कायमची बांधली गेली आहे.

आज मला तुम्ही नदी म्हणूनही संबोधत नाही, गटारगंगा म्हणून हिणवतात. यात माझी काय चूक? हे सर्व कशामुळे झालेय याचा विचार तरी कधी केलात? मी तर तुम्हा सगळ्यांना सुखावत समुद्राला जाऊन मिळण्यासाठीच पृथ्वीतलावर आले. अशी दूषित धारा घेऊन समुद्रात जाताना मला कसा आनंद होईल? म्हणून आजचा दिवस निवडला तुमच्याशी बोलायला. तुम्ही जल दिन साजरा करीत आहात ना!

आज तुम्ही जलबचतीची, शुद्धतेची प्रतिज्ञा केली असेल. चांगली गोष्ट आहे. माझ्या लेकरांनो, तुमच्या भविष्यासाठी तेच गरजेचे आहे. माझ्या अस्तित्वापेक्षा तुमच्या अस्तित्वासाठी माझं जगणं महत्वाचं आहे. पाण्याला उगाच जीवन म्हणत नाही. पिण्यासाठी, शेती फुलविण्यासाठी, उद्योगासाठी, विज्ञानाच्या प्रयोगासाठी, पृथ्वीवरील सजिवांसाठी पाणी गरजेचे आहे.

माझ्यामुळे परिसरातील भूजलाची पातळीही वाढते. पृथ्वीवरील एकूण गोड्या पाण्यापैकी अंदाजे ९९ टक्के भूजल आहे. एकूण वापराच्या अर्ध्या भूजलाचा उपसा घरगुती वापरासाठी केला जातो. तर २५ टक्के भूजल सिंचनासाठी वापरले जाते. भूजलाचे महत्त्व योग्यरितीने न जाणल्याने त्याचा मोठ्या प्रमाणात गैरवापर होत आहे. भूजलाचा अतिवापर, ते दूषित करणे, त्याचे अतिशोषण यामुळे संपूर्ण जलचक्रावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असल्याने मानवी जीवनासाठी ते निश्चितपणे योग्य नाही. म्हणून तुम्हाला सावध करते आहे.

मर्यादीत संसाधने आणि अमर्याद गरजा असल्या की टंचाईची स्थिती येते. पाण्याची उपलब्धता आहे म्हणून अमर्याद उपयोग अशाच टंचाईच्या स्थितीला निर्माण करणारा आहे. जगात ८० टक्के सांडपाणी कोणतीही प्रक्रीया न करता पर्यावरण साखळीत मिसळते. शुद्ध जलस्त्रोताचे अधिक शोषण न करता सांडपाणी व्यवस्थापनाद्वारे पाण्याचा पुर्नउपयोग न केल्यास २०३० पर्यंत जगाला ४० टक्के पाण्याची कमतरता भासू शकते. म्हणून घाण पाणी माझ्या पात्रात सोडण्याऐवजी त्यावर प्रक्रीया करून ते उपयोगात आणा.

तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, आतातरी जागे व्हा. मला जाणून घ्या. माझ्या संवर्धनासाठी पुढे या असे म्हणणार नाही, तो तुमचा प्रश्न आहे. तुमच्या जीवनासाठी पुढे या! महाराष्ट्र शासनाने ङ्गचला जाणूया नदीलाफ हा चांगला उपक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्रातील नद्यांचे आरोग्य चांगले राहिले तरच आपले आरोग्य चांगले राहणार आहे आणि हेच लक्षात घेऊन राज्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. तुमचा सहभाग मिळाला तरच हा उपक्रम यशस्वी होणार आहे.

महाराष्ट्राला वारंवार भेडसावणाऱ्या पूर आणि दुष्काळ या समस्यांपासून मुक्तीसाठी नदीशी संवाद साधणे गरजेचे आहे. माझ्याबद्दल माहिती, तटावरील जैवविविधता, माझ्या समस्या जाणून घेतल्या तर भविष्यात तुमचे जीवन समृद्ध करण्यासाठी मला निर्मळ प्रवाहाने वाहता येईल. म्हणून संवाद साधूया!

बरेच दिवस अस्वस्थ होते, म्हणून खूप बोलले. याला रागावणे समजू नका. आईची हाक समजा. तुमच्या गावातली एकच नदी आहे. तीच लुप्त झाली तर तुमच्या भविष्याचे काय?...म्हणून चिंता वाटते. माझ्या इतर भगिनींचीही हीच स्थिती आहे. तेव्हा विचार करा, शेवटी माझ्या अंताची चिंता नाही, माझ्या लेकरांचं काय हाच विचार सारखा मनाला अस्वस्थ करतो. वाहणे आणि पुढे जाणे माझा धर्म आहे, तशी मी जाणार. माझा प्रवाह तुम्हाला सुखावणारा असावा म्हणून मला जाणून घ्या एवढेचः!

# गोरेगावमध्ये महाविकास आघाडीचा घरकुल योजनेकरीता तहसिलवर मोर्चा

**गोरेगावः-** येथील नगर पंचायतीच्यावतीने सर्वसामान्य व दारिद्र्य रेषेखाली नागरिकांना देण्यात आलेल्या आवास योजनेतील घरकुलाची थकीत निधीसह नवीन घरकुल मंजूर करण्याच्या मागणीला घेऊन भारतीय कम्युनिस्ट पार्टी अतंर्गत राज्य लाल बावटा शेत मजदूर संघटनेच्यावतीने तहसिल कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

या मोर्च्याला महाविकास आघाडीचे घटक पक्ष काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेसने आपला पाठिंबा देत सहभाग नोंदवला. मोर्च्यात शेत मजदूर युनियनचे राज्य उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले,चरणदास भावे,कल्पना डोंगरे,गुणंतराव नाईक,रायाबाई मारगाये,चैतराम दियेवार तर महाविकास आघाडीचे मलेश्याम येरोला,माजी उपसरपंच राहूल कटरे,राष्ट्रवादी काँग्रेसचे कमलेश बारेवार,मेघराज चौधरी,शिवसेनेचे अविराज बोंबार्डे आदीं सहभागी झाले होते.गोरेगाव नगर पंचायतचे मुख्याधिकारी है सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचा निषेध यावेळी नोंदवण्यात आला.

तसेच नायब तहसिलदार चांदेवार यांना मागण्याचे निवेदन सादर करण्यात आले.

यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल लाभार्थ्यांना थकीत निधी उपलब्ध करुन देण्यात यावे.डीपीआर ३ मंजूर करण्यात यावे.अतिक्रमणधारकांना पट्टे देण्यात यावे.शहरात स्वच्छतेची कामे करण्यात यावी आदी मागण्यांचा समावेश होता.

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# करजगावातील सत्यशोधक कार्यकर्ते



**सतीश जामोदकर**
**हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८**

लक्ष्मणरावजी सोनार: हे सत्यशोधक मताचे गृहस्थ होते. त्यांच्याचघरी सावित्री बाईच्या दुसऱ्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले होते. त्यांची दोन्ही मुले गोपाळराव व कृष्णाजी सत्यशोधक चळवळीत कार्य करीत होते. कृष्णाजींच्या वाड्यात करजगावातील सत्यशोधक समाजाची पहिली सभा नारोबाबा महाधट शास्त्री पानसरे व धर्माजी रामजी डुंबरे पाटील, ओतुरकर यांनी घेतली होती. लक्ष्मण शास्त्री सोनार यांचा मृत्यू २९-१०-१०१० साली झाला. तर गोपाळरावांचा मृत्यू ०६-१०-१९१२ साली झाला.

भगवंतराव कांडलकर: भगवंतराव बाळाजी कांडलकर यांनी सत्यशोधक समाजाचे फार मोठे काम केले. ते वऱ्हाडी प्रांताचे अध्यक्ष होते. त्यांच्या घरीच सत्यशोधक समाजाचे करजगावातील मुख्य कार्यालय होते. भगवंतरावांचा सत्यशोधक अधिवेशनात सहभाग होताच तसेच माळी शिक्षण परिषदेमध्ये सुद्धा ते हरिरीने कार्य करीत. दुसऱ्या मुंबई येथे पार पडलेल्या १९११ सालच्या परिषदेचे ते अध्यक्ष होते. सत्यशोधक समाजाच्या कार्यकारी मंडळाचे ते उपाध्यक्षही होते. त्यांच्या मार्गदर्शनाखालीच करजगावातील सत्यशोधक समाज वाटचाल करीत होता. भगवंतराव बाळाजी कांडलकर यांचा मृत्यू १९३० साली झाला.

अमृतराव कृष्णाजी चौधरी: हे एक श्रीमंत, शिक्षणप्रेमी व सत्यशोधक समाजाचे कट्टर अनुयायी होते. ते व्यवसायाने पटवारी होते. त्यांच्या घरी मिळालेल्या छायाचित्रावर सत्यशोधक असे स्पष्ट छापलेले दिसते. त्यांनी अमृतगीता नावाचा काव्यसंग्रह १९०७ साली लिहिला. १९१८ साली तो विद्यासागर छापखाना अमरावती येथे प्रकाशित केला. त्यांच्या पत्नी सुमंतादेवी यांनी त्याचे जीवनचरित्र काव्यरूपाने वर्णन करुन अमृतभजन भाग-१, भाग-२ असे १९१७ मध्ये करजगावात प्रकाशित केले. अमृतगीता नावाचा काव्यग्रंथ भाऊसाहेब मांडवकर यांनी पुन्हा नव्याने संपादीत केले आहे. त्यांच्यावर कृष्णराव भालेकर यांचा मोठा प्रभाव होता.

शंकरराव बाळाजी पाटील म्हाला: शंकरराव पाटील यांनी सत्यशोधक चळवळीमुळे शैक्षणिक कार्य केले. व सत्यशोधक समाजात काम करणाऱ्यांना बळ दिले. शंकरराव पाटील यांच्या वडीलांजवळ पाटीलकीचे वतन होते. त्यांचे लग्न पार्वतीबाई उर्फ अलोकाबाई नावाच्या मुलीशी झाले. त्यांना एकच मुलगी होती. तिचे नाव अंजनी. त्यांच्या कृष्णाजी कर्काजी चौधरी यांच्याशी संबंध आला व त्यांच्याशी गाठ मैत्री झाली. या दोघांनीही स्वतःच्या मुलींना शाळेत घातले. शंकररावांनी लायब्ररी, छापखाना यासाठी भरपूर मदत केली. गावात शाळा नसल्याची त्यांना खंत होती. ती त्यांना गावात शाळा काढून पूर्ण केली. शाळेचे नाव ए.व्ही.स्कूल होते. पुढे त्याच शाळेचे नाव श्री शंकरराव ए.व्ही.स्कूल ठेवण्यात आले. या शाळेसाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नीने त्यांचे अपूर्ण राहिलेले काम पूर्ण केले. आज या शाळेची इमारत गावाच्या दर्शनी भागास असून ती गावाच्या वैभवात भर घालते.

गणपतराव शिवरामजी सोनार: हे श्रीमंत गृहस्थ असले तरी त्यांना समाज शिक्षणाची तळमळ होती. ते स्थानिक सत्यशोधक समाजाचे सभासद होते. करजगावच्या सामाजिक व शैक्षणिक विकासाकरिता त्यांनी काम केले. दुष्काळात त्यांनी गोरगरीबांच्या उदरनिर्वाहाची सोय लावली होती. त्यांचे कनिष्ठ पुत्र डॉ. भाऊसाहेब सोनार हे फार मोठे राजकीय दृस्य म्हणजे पुढे आले. ते मध्यप्रांत वऱ्हाड सरकारचे विधीमंत्री होते.

मारोतीराव सोनाजी चौधरी उर्फ नाना पाटील: शंकरराव पाटील व अमृतराव कृष्णाजी चौधरी यांच्यासोबत सामाजिक शैक्षणिक कार्यात ते काम करीत. ते मराठा शिक्षण परिषदेला उपस्थित राहत. त्यामागे सत्यशोधकी प्रेरणाच होती.

मारोतराव पुजांजी कोरडे: हे सुद्धा सत्यशोधक चळवळीचे काम करीत होते. त्यांच्या जन्म १८९७ ला झाला. तर मृत्यू २३ जून १९५३ ला झाला. त्यांचे पुत्र विनायकराव कोरडे हे महाराष्ट्र शासनाचे मंत्री होते. तर ते दोन वेळा अचलपूर मतदारसंघाचे आमदार होते. त्यांनी गावाच्या नावलौकीकात भर घातली. यामागे सत्यशोधकी प्रेरणाच होती.

मोतीराव भगवतराव कांडलकर: हे सत्यशोधक समाजाचे सक्रीय कार्यकर्ते होते. तसेच लोकसेवक सुद्धा होते. सहकारी तत्वावर त्यांची गाढ निष्ठा होती. त्यांनी करजगावात सर्वप्रथम सहकारी पतपेढी काढली. तिची स्थापना १९ जून १९२० ला केली. ते १९२९-१९५० पर्यंत करजगावचे सरपंच होते. सत्यशोधक परिषद, माळी शिक्षण परिषद यामध्ये ते सहभागी होते. त्यांचे ११-१०-१९५० ला निधन झाले.

मोतीराव तुकाराम वानखडे: मोतीराव तुकारामजी वानखडे हे सत्यशोधक चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते व नेते होते. कृष्णाजी कर्काजी चौधरी आणि मो.तु.वानखडे अशी ही सत्यशोधक चळवळीतील गाजलेली जोडी होती. त्यांचा स्वयंपुरोहित नावाचा ग्रंथ फार गाजला. त्या ग्रंथाच्या तेरा आवृत्या निघाल्या, त्याशिवाय त्यांनी इतरही सत्यशोखक विचारांचे साहित्य लिहिले.

१) संगीत शेतकऱ्यांची गोफण (१९०३) २) संगीत सत्यशोधक चाबुक (१९०८) ३) सत्याचा शोध (१९०९) ४) स्वयंपुरोहित अथवा पुजा पद्धती (१९०५) ५) संगीत भटांचे थोतांड खंडण (सत्यथ प्रदीप) (१९०५) ६) ब्राम्हण आणि बहिष्कार (१९१४) ७) ब्राम्हणांचा हक्क नाही अशाबद्दल हायकोर्टात झालेले ठराव (चौथी आवृत्ती १९२९) ८) पवित्र कोण ब्राम्हण की न्हावी? (पाचवी आवृत्ती-१९२३) ९) सत्यशोधकी ठराव (संपादक) (१९११), १०) वानखडे यांचे खान्देशातील भाषण (१९२९), ११) संत सावता माळ्याचे अभंग (संपादक) (१९१९), १२) सावता माळी यांचे अल्पचरित्र (१९२१), १३) गायत्री मंत्र व्याख्यान, १४) वेदाचार प्रकाशक १५) इशारा १६) पेशवाईतील जुलमाचा पोवाळा १७) सत्यशोधकांचा शंकराचार्याशी सामना. त्यांची काही पुस्तके उपलब्ध नाहीत.

त्यांनी व त्यांची प्रकाशित केलेली सर्व पुस्तके खूप गाजली. सत्यशोधक चळवळीत इतके विपुल लेखन पुस्तक रूपाने क्वचीतच कुणी केले असेल त्यांचा स्वतःचा सत्योदय छापखाना होता. त्यांच्या पत्नीचे नाव मालनबाई (माहेरचे नाव सखुबाई) त्यांना एक मुलगा होता त्याचे नाव अण्णा, ते मिल्ट्रीत होते व त्यांनी तेथून आल्यानंतर वैद्यकीय व्यवसाय केला. त्यांचा जन्म १-७-१९०९ ला झाला. मोतीरावांच्या जन्माची तारीख उपलब्ध नाही. शेतजमीन विकून त्यांनी छापखाना घेतला होता. सत्यशोधक समाज परिषदा, ब्राम्हनंतर पक्ष, माळी शिक्षण परिषदा यामध्ये त्यांचा फा मोठा सहभाग होता. करजगावात सत्यशोधक समाज स्थापन झाला तेव्हापासून ते त्यामध्ये कार्य करीत होते. माळी शिक्षण परिषदेच्या चहार्डी येथील १० व्या परिषदेचे अध्यक्ष होते. ते उत्तम खर्डे वक्ते आणि संशोधक लेखक होते. नगर काँग्रेस कमिटीतही ते अध्यक्ष म्हणून निवडून आले होते. क्षत्रीय माळी पुढारी या मासिकाचे ते संपादक ही होते. चरखा संघ,सॅनिअेशन कमिटी, बहेरम कॉन्फरंस इ.संस्थेतही त्यांनी काम केले. १९५०-१९५३ च्या दरम्यान मृत्यू झाला.

मालनबाई मोतीराव वानखडे: मालनबाई मोतीराव वानखडेच्यन पत्नी होत. आपल्या पतीप्रमाणेच त्याही समाजकार्य करीत होत्या. त्या शिक्षणप्रेमी व दानशूर होत्या. विदर्भ माळी भगीनी मंडळाच्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. त्या मोतीराव वानखडे यांच्या सत्यशोधक कार्यात सहभागी होत असत.

# पाण्याची बचत काळाची गरज



पाणी हे जीवन आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवणे ही आजच्या काळाची गरज आहे. आज जर आपण पाणी वाचवले नाही तर आपल्या येणा?्या पिढीला त्याच्या प्रत्येक थेंबासाठी तळमळ करावी लागेल. पाण्याची पातळी सातत्याने कमी होत आहे, जिथे २० वर्षांपूर्वी ४० फूट खोलीतून येणारे पाणी आता ९० ते १०० फूट खाली गेले आहे.

सजीवांच्या अस्तित्वासाठी पुरेशा स्वच्छ पाण्याची उपलब्धता न झाल्यास त्याचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. गेल्या काही काळात नैसर्गिक बदलामुळे पावसाचे प्रमाण व वेळा निश्चित झाल्याने पाण्याचे नियोजन करणे अडचणीचे झाले आहे. राज्यात गेल्या काही वर्षात निर्माण होणाऱ्या सततच्या अवर्षण परिस्थितीमुळे पाणी टंचाईमुळे पाणी टंचाईचे संकट वाढत आहे.

राज्यातील सिंचन व बिगर सिंचनाचा पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक पायाभुत सुविधा निर्माण करण्याचे सर्वतोपरी प्रयत्न शासनामार्फत केले जात आहेत. मात्र पाणी टंचाईचे प्रश्न सोडविण्यासाठी जनतेचा सक्रीय सहभाग व सहकार्य मिळाल्याशिवाय पाण्याचे प्रश्न संपणार नाहीत. त्यासाठी पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्त्रोत, नदया व जलाशलयाचे प्रदुषण रोखणे, पायाभुत सुविधाचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे याबाबत समाजात जागृती व साक्षरता निर्माण होण्याची गरज आहे.

सर्वप्रथम पाण्याचा अपव्यय थांबवावा लागेल. आपल्या देशात काही उघडे नळ, तर कुठे विनाकारण पाण्याचा वापर केला जातो. सार्वजनिक ठिकाणी नळ चालू असेल तर तो बंद करणे ही जबाबदारी कोणीही मानत नाही, सर्वप्रथम प्रत्येक व्यक्तीने आपली जबाबदारी समजून नळ सुरु न ठेवता कपडे धुतांना कमीत कमी पाणी वापरावे. आंघोळ करण्यासाठी आपण आपल्या गरजांसाठी अनेक पटींनी पाणी वाया घालवतो, तर दुसरीकडे आकाशात कडाक्याच्या उन्हात उडणारे पक्षी तहानेने मरतात.

पाणी हा जीवनाचा आधार आहे, ते वाचवायचा असेल तर त्याचे संवर्धन केले पाहिजे. पाण्याची उपलब्धता कमी होत आहे, साथीचे आजार वाढत आहेत, त्यामुळे या जलसंकटावर उपाय शोधणे ही आजच्या काळाची गरज आहे. पाण्याची बचत करणे ही देशातील प्रत्येक नागरिकाची राष्ट्रीय जबाबदारी आहे. याबाबत आंतरराष्ट्रीय स्तरावरही विचार केला पाहिजे. जबाबदारीची जाणीव ठेवून समाजातील प्रत्येक घटकांनी पाण्याची बचत करणे गरजेचे आहे. पाण्याचे स्त्रोत मर्यादित आहेत, अशा परिस्थितीत पाण्याचे स्त्रोत सुरक्षित ठेवून आपण पाण्याच्या संकटाचा मुकाबला करू शकतो. यावर आळा घालण्याकरीता प्रत्येकाने पाण्याचा वापर काटकसरीने करावा.

आपण म्हणतो, शेती नसेल तर खाणार तरी काय? पण यामध्येही पाण्याची थोडी काळजी घेतली तर पाण्याची बचत होऊ शकते. प्रत्येक पिकानुसार पाणी निश्चित करावे, त्यानुसार सिंचनाच्या कामांसाठी सिंचनाचे नियोजन करावे. कॉम्प्रेसर आणि ठिबक सिंचन यांसारख्या कमी पाणी वापर तंत्रज्ञानांना प्रोत्साहन दिले पाहिजे. विविध पिकांसाठी कमी पाणी वापर आणि जास्त उत्पादन देणाऱ्या बियाण्यांसाठी संशोधनाला प्रोत्साहन द्यावे. शक्यतो अशा अन्नपदार्थांचा वापर करावा ज्यामध्ये कमी पाणी वापरले जाते. अन्नपदार्थांचा अनावश्यक अपव्यय कमी करणे देखील आवश्यक आहे, त्यामुळे त्याच्या उत्पादनात पाण्याचा वाढलेला वापर व्यर्थ जातो.

आपण पाण्याची बचत का करावी ? त्यासाठी पाण्याचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. सर्वप्रथम मनुष्य आपल्या जीवनात इतर गोष्टींशिवाय जगू शकतो, परंतु तो ऑक्सिजन, पाणी व अन्नाशिवाय जगू शकत नाही. या तीन मौल्यवान गोष्टींपैकी पाणी सर्वात महत्वाचे आहे.

आपल्या पृथ्वीवर ७१ टक्के पाणी असून फक्त २ टक्के पाणी हे आपल्या पिण्याचे पाणी आहे. २०२५ पर्यंत हे पाणी ३ टक्के होईल असा अंदाज आहे. पाण्याची टंचाई दूर करण्याकरीता पाणी वाचवले तर उद्या आणि आज हा प्रश्न सुटू शकतो. त्यासाठी आजपासूनच पाणी सुरक्षित करून त्याचा अपव्यय थांबवावा.

सर्वप्रथम आपण शपथ घेतली पाहिजे की, आपण पाण्याची बचत करू आणि त्याचा अपव्यय थांबवू. संपूर्ण पृथ्वीवरील सर्व लोकांनी थोडे थोडे पाणी वाचवले तर भरपूर पाणी वाचवता येईल. पावसाचे पाणी साठवून ते इतर दैनंदिन कामात जसे की कपडे धुणे, बागेला पाणी देणे, आंघोळीसाठीही वापरता येते. आंघोळ करताना आंघोळीसाठी शॉवरऐवजी बादली वापरली तर दररोज १०० ते २०० लिटर पाण्याची बचत होऊ शकते. नळ घट्ट बंद करावे, नाही तर पाणी टपकत राहिल्यामुळे भरपूर पाणी वाया जाते. पावसाळ्यात जास्तीत जास्त झाडे लावावे, जेणेकरून झाडांना नैसर्गिकरित्या पाणी मिळू शकेल.

आपण सामाजिक कर्तव्य देखील समजून घेतले पाहिजे, जेणेकरून पाण्याचा अपव्यय थांबवता येईल. जिथे आपण नळ वाहत असल्याचे पाहतो, मग ते रेल्वे स्थानक असो, बसस्थानक असो किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाण असो, वाहत्या नळाचे होणारे नुकसान व वाया जाणारे पाणी वाचवा. ही समस्या सोडवण्याची आजची गरज लक्षात घेतली नाही तर उद्या आपले मोठे नुकसान होईल. अशाप्रकारे पाणी आपल्यासाठी आणि इतर सजीवांसाठी पृथ्वीवर जीवन प्रदान करते. त्यामुळे आज पाण्याची बचत करण्याची गरज आहे, पाणी असेल तर उद्या जीवन आहे.

**- के. के. गजभिये**
उपसंपादक,
जिल्हा माहिती कार्यालय,गोंदिया

# विद्यार्थ्यांना भोजन-निवासाची सोय; प्रत्येक दोन जिल्ह्यात दोन वसतिगृहे



**विद्यार्थ्यांसाठी शासनाची योजना: एक मुलांसाठी तर एक मुलींसाठी वसतिगृह**

**गोंदिया:** इतर मागास, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांची सोय व्हावी म्हणून आता राज्य शासन स्वत: प्रत्येक जिल्ह्यात दोन वसतिगृहे भाड्याने घेणार आहे. जेणे करुन स्पर्धेच्या युगात या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना टिकून राहता यावे, तसेच त्यांना आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या विविध क्षेत्रात स्पर्धेला तोंड देता यावे, शैक्षणिकदृष्ट्या उन्नती व्हावी,, हा यामागचा शासनाचा उद्देश आहे. याता विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.

**काय मिळणार सुविधा**

या वसतिगृहात विद्यार्थ्यांसाठी मोफत निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य, आरोग्य आदी सोयीसुविधांनी युक्त निवासाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

**दोन्ही वसतिगृहे राज्य शासन चालविणार**

प्रत्येक जिल्ह्यात एक मुलींसाठी व एक मुलांसाठी अशी दोन वसतिगृहे सुरु होणार आहेत. ही दोन्ही वसतिगृहे शासन चालविणार आहे.

**वसतिगृह प्रवेशासाठी काय कराल?**

विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा, विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न एक लाखापेक्षा कमी किंवा राज्य मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीसाठी निर्धारित करेल त्याप्रमाणे असणार आहे. प्रवेशासाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा लागणार आहे. तसेच गुणवत्तेनुसार व प्रवर्गनिहाय विहित टक्केवारीनुसार प्रवेश निर्धारित केले जातील.


**कोणाला मिळणार लाभ**

प्रत्येक जिल्ह्यात इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १०० विद्यार्थी व १०० विद्यार्थिनींना प्रवेश देण्यात येणार आहे.

**केंद्र शासनाचे मिळणर सहकार्य**

शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्रावास योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून ही वसतिगृहे सुरु करण्यात येणार आहेत. बांधकामासाठी निधी मिळणार आहे.

# शिवसेनेची बिकट वाट




निवडणूक आयोगाने शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह आणि शिवसेना हे नाव शिवसेनेतून बाहेर पडलेल्या ४० आमदारांच्या गटाला दिले.आम्हीच बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचे खरेखुरे शिवसैनिक म्हणून मिरवत असताना एका ताकदवर शक्तीच्या आडोशाने लपतछपत हे घडत गेले आणि शिवसेनेचे लचके तोडणारे प्रसन्न झाले.त्यावर अतिशय गंभीर आणि धीरोदात्तपणे व्यक्त झालेले शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मात्र सूचकपणे हा लढा खऱ्या अर्थाने कोणाविरुद्ध आहे, हे सांगत आहेत.

शिवसेना फोडणाऱ्यांविरोधात आग त्यांच्या डोळ्यात दिसत आहे, तर त्यांचे पाठीराखे खंबीरपणे त्याच्यामागे उभे आहेत. कोणेएकेकाळी महाराष्ट्रात युतीच्या आणाभाका घेत धाकटा भाऊ थोरला भाऊ करत शिवसेनेचा खांदा वापरणाऱ्यानी केसानी गळा कापल्याच्या भावना व्यक्त होत असल्यास नवल काय? महाराष्ट्रात प्रबोधनाची मोठी परंपरा आहे. सत्यशोधक चळवळीच्या झंझावाती कार्यपद्धतीत अनेक ब्राम्हणेतर मुखंडं तावूनसुलाखून निघाले. ब्राम्हणेतर चळवळीत मोठा दबदबा असलेले प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे प्रबोधन चळवळीतील अमूल्य रत्न. त्यांनीच शिवसेना हे नाव सुचवले, असे आता पुढे येऊ लागले. यावरून शिवसेनेच्या जन्माचा हेतू ध्यानात येतो, शिवसेनेतून फुटलेल्यांपेक्षा फोडणाऱ्यांना अधिक नीटपणे समजलेला असणार. शरद पवारांना त्यांच्या मातोश्रींचा राजकीय वारसा आहे. शारदाबाई पवार ह्या राजर्षी शाहू महाराजांनी स्थापन केलेल्या व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग मध्ये राहून शिकल्या, पुण्यातील सेवासदन मधून शिक्षण घेतले. पुणे लोकल बोर्ड च्या एकमेव महिला राखीव जागेवर त्या अविरोध निवडून आल्या. लहानपणापासून शाहूमहाराज, ब्राम्हणेतर चळवळीचा प्रभाव त्याच्यावर होता. तोच वारसा शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून जपला. म.गांधींच्या नेतृत्वातील तत्कालीन काँग्रेसला सत्यशोधक चळवळीतून उदित ब्राम्हणेतर पक्षाने काँग्रेसला जनाधार मिळून दिला. त्यामुळे टिळक युगापर्यंत काँग्रेस म्हणजे शेटजी भटजी लाटजींचा पक्ष अशी काँग्रेसची असलेली प्रतिमा बदलून काँग्रेसला व्यापक जनाधार मिळू लागला. महाराष्ट्रात काँग्रेसचे नेतृत्व दीर्घकाळ ब्राम्हणेतर करत आहेत. अशी काँग्रेस सोबत घेऊन महाविकास आघाडीचा प्रयोग ब्राम्हणेतर राजकारण भक्कम करते. शिवराय फुले शाहू आंबेडकरांच्या महाराष्ट्रात ब्राम्हणेतर राजकारणाचा वारू सुसाट वेगाने निघाला असताना आणि देशात महाराष्ट्र अव्वल होऊ पाहत असताना,तो वारु थोपवण्यासाठी कासावीस झालेली पेशवाईची प्रियकर चांडाळचौकडी महाराष्ट्राने पाहिली. शिवसेना पक्ष फोडून सत्ता पालटवून मिंध्यांना पुढे करुन दुय्यमत्व स्विकारणे शिखंडीच्या पाखंडी सोयऱ्यांनाच का जमते? याचे उत्तर त्यामागील दडलेला त्यांचा सनातन स्वार्थ समजून घेतला तर कळेल. शिवसेनेवर आघात करुन सत्ता येणेच पुरेसे नाही तर महाविकास आघाडीने पकडलेली ब्राम्हणेतर राजकारणाची लय बिघडवणे, ब्राम्हणेतर राजकारण खतम करुन फुटीरतावाद्यांच्या मदतीने चोरपावलांनी पेशवाई आणणे, शिवसेनेवरील कुरघोडीमागील ही खरी गोम आहे.

मंडलनंतरच्या काळात प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य वाढू लागले. त्यामुळे भारतीय राजकारणात आघाडीच्या राजकारणाने सत्ता प्रभावित केली. द्विपक्षीय सांसदीय राजकारणाची भलावण करणारे उच्चजातवर्णीय नेतृत्व आणि प्रसारमाध्यमातील चाणाक्ष मंडळी दोनच प्रबळ राष्ट्रीय पक्ष असावेत म्हणून डिंडीम बडवत असताना अनेक राज्यात प्रादेशिक पक्ष आणि स्थानिक नेतृत्व यांची मूळं घट्ट होत होती. स्वातंत्र्यप्राप्तीतरही ओबीसी दलित आदिवासी यांना पुरेसे नेतृत्व आणि प्रतिनिधित्व मिळत नसल्याने प्रादेशिक पक्षांच्या स्वरूपात ब्राम्हणेतर नेतृत्व विकसित होत गेले. मंडल आंदोलनाने ओबीसी राजकीय नेतृत्व विकसित झाले. लालूप्रसाद, मुलायमसिंग, शरद यादव, देवेगौडा, करुणानिधी, चंद्राबाबू नायडू, नितीश कुमार, छगन भुजबळ, अर्जुनसिंग, सितराम केसरी इ.नेते प्रभावी ठरत असताना एनडीएच्या प्रयोगातून अनेक प्रदेशात मित्रपक्ष शोधत शिवसेनेसारखा अनेक प्रादेशिक पक्षांचा वापर झाला. आज शिवसेनेची जशी गत केली त्यापेक्षा वेगळी एनडीएच्या घटकपक्षांची अवस्था दिसत नाही. नवाश्मयुगातील गावांच्या भोवती असलेल्या संरक्षक भिंतींचे आणि खंदकांचे पुरावे मिळाले आहेत. पूर, जंगली जनावरे,तसेच गुरे चोरून नेणारे बाहेरचे लोक यांच्यापासून संरक्षण मिळवण्यासाठी या भिंती बांधल्या जायच्या. मानवाची ती रानटी अवस्था होती. आजच्या नागरी समाजात देखील मानव सुरक्षित नाही.नैसर्गिक आपत्ती, जंगली जनावरे यांच्यापेक्षाही माणसांपासून माणूस सुरक्षित राहिला नाही. त्यातही स्वदेशीय स्वधर्मीय म्हणता येईल, अशी ही माणसाची जात्यांध नवी हावरट जमात धुडगूस घालून राजकीय व्यवस्थेत गब्बर बनू पाहत आहे. नैतिक,न्यायिक,सांविधानिक, मानवी मूल्यांच्या भिंती लांघून मानवाधिकाराचे उल्लंघन होत आहे.माणसं, पक्षनाम, पक्षचिन्हे चोरीला जात आहे.

विरोधी पक्षांच्या जीवावर उठलेले एकचालकानुवती नेतृत्व मित्रपक्षांशी गरज सरो अन वैद्य मरो,या अलंकृत कृतघ्न मूल्यांनी शोभूनच दिसावेत. शिवसेनेचे नामोनिशाण मिटवण्यासाठी चाललेला महाएपिसोड बघता हे ध्यानात येते. सत्ताविरोधकांना धडकी भरवून, मित्रपक्षांना बगलेत मारून ठेवणे अशा दुष्कृत्यांचा सामुहिक प्रतिकार केल्याशिवाय गत्यंतर नाही.

**अनुज हुलके**

# जि.प.शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी आमची शाळा आदर्श शाळा उपक्रम प्रेरणादायी-सीईओ शितल पुंड



**गोंदिया:-** अदानी फाउंडेशन तिरोडा व जिल्हा परिषद गोंदियाच्या प्राथमिक शिक्षणाच्या संयुक्त वतीने जिल्हा परिषदेच्या शाळांकरिता राबविण्यात येणारा आमची शाळा, आदर्श शाळा हा स्पर्धात्मक उपक्रम प्रेरणादायी आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून व लोकसहभागातून जि.प.शाळांचा कायापालट होत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती शितल पुंड यांनी केले. त्या अदानी फाउंडेशन द्वारा आयोजित आमची शाळा आदर्श शाळा उपक्रमाच्या बक्षीस वितरण सोहळ्यात होत्या.

याप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये, डायटचे प्रा.डॉ.नरेश वैद्य,समग्र शिक्षा अभियानचे जिल्हा व्यवस्थापक बाळकृष्ण बिसेन, अदानी फाउंडेशनचे प्रमुख बिमुल पटेल उपस्थित होते. प्रास्ताविकात बिमुल पटेल यांनी जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासासाठी अदानी फाउंडेशन सदैव तत्पर असून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकरीता हवे असलेल्या सर्व सहकार्याची भूमिका कायम राहील असे त्यांनी सांगितले. शिक्षणाधिकारी डॉ.महेंद्र गजभिये यांनी आमची शाळा आदर्श शाळा या उपक्रमाची प्रशंसा करताना या उपक्रमाच्या माध्यमातून जि प च्या शाळांमध्ये गुणवत्ता वाढ व भौतिक विकास लोकसहभागातून होत असल्याचे बोलत विजेत्या शाळांचे अभिनंदन केले. तसेच डॉ. नरेश वैद्य यांनी स्पर्धेच्या मूल्यांकनाविषयी माहिती दिली.

आमची शाळा आदर्श शाळा २०२२- २३ या वर्षाचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार गोंदिया तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खर्रा ने पटकावला. तर सालेकसा तालुक्यातील जि.प.उच्च प्राथमिक शाळा बोदलबोडी व्दितीय आणि तृतीय क्रमांक गोरेगाव तालुक्यातील जि.प.उच्च प्राथमिक शाळा हिरडामालीने पटकाविला. जिल्हास्तरीय विजेता तीनही शाळांना अदानी फाउंडेशन तर्फे अनुक्रमे १ लाख २१ हजार व स्म ृतिचिन्ह, ७५ हजार व स्मृतिचिन्ह, ५१ हजार व स्मृतिचिन्ह देऊन अनुक्रमे गौरविण्यात आले.

तर अर्जुनी मोरगाव तालुकास्तरावर प्रथम जि.प.उच्च प्राथमिक शाळा मोरगाव तर द्वितीय उच्च प्राथमिक शाळा माहूरकूडा. आमगाव तालुका प्रथम जि.प.उच्च प्राथमिक शाळा करंजी तर द्वितीय जि.प. उच्च प्राथमिक शाळा शिवनी, देवरी तालुका प्रथम जि.प. उच्च प्राथमिक शाळा डवकी तर द्वितीय जि.प. उच्च प्राथमिक शाळा घोणाडी, गोंदिया तालुक्यातून प्रथम जि.प. उच्च प्राथमिक शाळा खर्रा तर द्वितीय जि.प. उच्च प्राथमिक शाळा रापेवाडा, गोरेगाव तालुक्यातून प्रथम जि.प. उच्च प्राथमिक शाळा हिरडामाली तर द्वितीय क्रमांक जि.प. उच्च प्राथमिक शाळा सटवा, सालेकसा तालुक्यातून जि.प. उच्च प्राथमिक शाळा बोदलबोडी तर द्वितीय जि.प. उच्च प्राथमिक शाळा झालिया, सडक अर्जुनी तालुक्यातून प्रथम जि.प. उच्च प्राथमिक शाळा पळसगाव तर द्वितीय जि.प. उच्च प्राथमिक शाळा घोटी, तिरोडा तालुक्यातून प्रथम जि.प. उच्च प्राथमिक शाळा खैरलांजी तर द्वितीय जि.प. उच्च प्राथमिक शाळा चिखली यांनी पटकावला वरील प्रथम व द्वितीय क्रमांक पटकाविणाऱ्या शाळांना अदानी फाउंडेशन तर्फे प्रत्येकी रोख ४५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह तसेच ३० हजार रुपये व स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले तसेच उत्कृष्ट गटशिक्षणाधिकारी म्हणून सालेकसा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विशाल डोंगरे, गोंदिया पंचायत समितीचे जनार्दन राऊत व गोरेगाव पंचायत समितीचे निलकंठ शिरसाटे यांना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

उत्कृष्ट केंद्रप्रमुख म्हणून एस.एम. भैसारे, बी.एन. बोरकर, सौ.निशा बोदले, गुलाब भुसारी, एस.जी.कश्यप, एन.एस.लंजे, एस.एम. पडोळे, के.आर. गोटेफोडै, यु.एम. बोपचे, एन.सी. बीजेवार, के.आर.वासनिक, बी.के.चांदेकर, धनराज पटले, विजेंद्र सिंग राठोड, तेजलाल भगत, यु.पी.बिसेन आदींना स्मृतीचिन्ह देऊन सन्म ानित करण्यात आले. संचालन व आभार प्रदर्शन अदानी फाउंडेशन कार्यक्रम अधिकारी राहुल शेजव यांनी केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी अदानी फाउंडेशनचे कैलाश रेवतकर, स्वप्निल वाहने, मिनेश कटरे, अपूर्वा पाटील यांनी परिश्रम घेतले.

# पाण्याचा वापर काटकसरीने करा-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे



**गोंदिया :** पाणी हे जीवन आहे. पाण्याचा प्रत्येक थेंब वाचविणे ही काळाची गरज असल्यामुळे सम ाजातील प्रत्येक घटकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले.

गोंदिया पाटबंधारे विभागाच्या वतीने १६ ते २२ मार्च या दरम्यान जिल्हाभर जलजागृती सप्ताह आयोजित करण्यात येत आहे. जलजागृती सप्ताहनिमित्ताने आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी चुलबंद नदी, बाघ नदी व वैनगंगा नदीच्या पाण्याचे जलपुजन व दीप प्रज्वलीत करुन उद्घाटन केले, त्यावेळी ते बोलत होते.


कार्यक्रमास अपर मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य श्रीकांत देशपांडे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी सुभाष चौधरी, उपविभागीय अधिकारी देवरी अनमोल सागर, भंडारा सिंचन मंडळाचे अधीक्षक अभियंता र.पु.पराते, पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनाली सोनुले, मध्यम प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता अमृतराज पाटील, बाघ इटियाडोह पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राजीव कुऱ्हेकर, धापेवाडा उपसा सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुर कापसे, पाटबंधारे उपविभाग तिरोडाचे उपविभागीय अभियंता मनमोहन पटले, पाटबंधारे उपविभागाचे सहायक अभियंता श्रेणी-१ संजीव सहारे, पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता दिलीप चौरागडे व संदिप विभुते, सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी सोनाली ढोके यावेळी उपस्थित होते.

पाणी हा जीवनाचा आधार आहे. ते वाचवायचे असेल तर त्याचे संवर्धन केले पाहिजे. मात्र पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी जनतेचा सक्रीय सहभाग व सहकार्य असणे गरजेचे आहे. त्यासाठी पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्त्रोत, नदया व जलाशयाचे प्रदुषण रोखणे, पायाभुत सुविधांचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करण्याबाबत समाजात जागृती व साक्षरता निर्माण करण्याची गरज असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

यावेळी जलजागृती सप्ताहनिम ित्त पाण्याचा वापर गरजेपुरता व काटकसरीने करेन, तसेच पाण्याचा अपव्यय व गैरवापर करणार नाही याबाबत संयुक्तपणे जलप्रतिज्ञा घेण्यात आली.

गोंदिया पाटबंधारे विभागाच्या वतीने १६ ते २२ मार्च या दरम्यान जिल्हाभर जलजागृती सप्ताह साजरा करण्यात येत असून १६ मार्चला सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते जलपुजन. १७ ते १८ मार्च दरम्यान सकाळी ११ वाजता उपविभाग स्तरावर प्रभात फेरी, चित्रकला स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन. २० मार्च रोजी सकाळी ११ वाजता गोंदिया पाटबंधारे विभाग येथे रांगोळी स्पर्धा व पाककला स्पर्धेचे आयोजन. २१ मार्चला सकाळी ११ वाजता बोदलकसा मध्यम प्रकल्प (ता.तिरोडा) येथे कार्यकारी अभियंता यांच्या हस्ते जलपुजन. २२ मार्च रोजी सकाळी ११ वाजता विभागीय/ उपविभाग स्तरावर समारोपीय कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. अशी माहिती यावेळी देण्यात आली. उपस्थितांचे आभार पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता सोनाली सोनुले यांनी मानले.

# महात्मा ज्योतिबा फुले जयंती होणार उत्साहात साजरी



**गोंदिया :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांनी सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातीव्यवस्थेचे निर्मूलन आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य केले. आजच्या आधुनिक विचारांच्या साक्षर समाज निर्मितीमध्ये त्यांचे अमुल्य योगदान आहे. ११ एप्रिल क्रांतीसुय महात्मा ज्योतिबा फुले यांचा जयंती दिन यावर्षी महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या संस्थेमार्फत संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरी करण्याचा मानस आहे. प्रत्येक जिल्ह्यात महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमि त्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असून तीन लक्ष रुपये निधी देण्यात येणार आहे.

त्यासाठी अतुल सावे, मंत्री इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या महाज्योती संचालक मंडळाच्या बैठकीत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती सर्व विभाग व सर्व जिल्ह्यांमध्ये अभिनव पध्दतीने साजरी करण्याबाबत ठराव मान्य करण्यात आलेला आहे.

सदर ठरावात प्रत्येक जिल्हयात शिक्षण विभागाच्या समन्वयाने महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनातील प्रसंगावर चित्रकला स्पर्धा, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनातील प्रसंगावर रांगोळी स्पर्धा, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन व विचारांवर वकृत्व स्पर्धा, मी सावित्रीबाई बोलते किंवा मी ज्योतिबा बोलतोय या विषयांवर एकांकिका स्पर्धा, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवन कार्यावर निबंध स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करायचे आहे. वरील नमूद सर्व कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी रु. ३.०० लक्ष प्रती जिल्हा व रु. १०.०० लक्ष प्रती विभाग असा निधी महाज्योती मार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. अशी माहिती प्रकल्प व्यवस्थापक, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

# डुप्लीकेट फेविक्कि व पिडीलाईट विकणारे गोंदियातील ३ व्यापारी पोलिसांच्या जाळ्यात

**गोंदिया:** गोंदिया पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेला मि ळालेल्या माहितीच्या आधारावर शहरात बनावटी (ड्युप्लीकेट) साहित्य, वस्तू , फेवी क्विकचा व्यवसाय करणाऱ्या चौघांविरुध्द गुन्हा दाखल करुन ८८९० रूपयाचा बनावटी फेवी क्विक जप्त करण्यात आले आहे. यांसदर्भात फिर्यादी मो.तौकीर मो.कालेखान चौधरी (वय २८,रा.जे.जे.कॉलोनी वजीरपुर अशोक विहार,उत्तरप्रदेश दिल्ली) व्यवसाय-टिम लिडर,सेमि ता लिगल अडव्होकेट एन्ड सॉलिसिटर यानी कंपनी तर्फे न्यायीक काम पाहण्याकरीता प्राधिकृत केल्याचे कळवून तक्रार नोंदवली होती.

या अनुषंगाने पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर यांनी सदर प्रकरणाची वस्तुस्थिती जाणून घेवून कायदेशीर कारवाई करण्याबाबत स्थानिक गुन्हे शाखेला निर्देश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश लबडे यांनी पथकासह सदर बाबीची संपूर्ण शहानिशा करून गुप्त बातम ीदारामार्फत खात्रीशिर माहीतीच्या आधारे १४ मार्चच्या सायंकाळी बजाज ट्रेडर्सचे मालक श्याम मोहनलाल बजाज,दिपक बच्चुमल लिलवानी व विवेक हरिशंकर गुप्ता यांना बनावटी (डूप्लीकेट) फेविक्वीक विक्री करताना तसेच दुकानात बाळगताना रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले.

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करावी-जितेंद्र कटरे



**गोरेगाव:** देशात रासायनिक शेती वाढल्याने रासायनिक खतांचे भाव गगणाला भिडले आहेत. त्यामुळे शेतीत रासायनिक खतांचा वापर शेतकऱ्यांना परवडणाा नाही. यासाठी शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेती करावे असे प्रतिपादन जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र कटरे यांनी केले.

तालुक्यातील ग्राम शहारवानी येथे आयोजित शेतकरी प्रात्याक्षिक प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी पंचायत समिती उपसभापती राजकुमार यादव, पंचायत समिती सदस्य चित्रकला चौधरी, कवलेवाडा सरपंच शकुंतला कटरे, गटविकास अधिकारी अजीत सिंग पवार, तालुका कृषी अधिकारी पाथोडे, कृषी अधिकारी डी.बी.उईके, पं.स.समन्वयक नामदेव नाईक, उपसरपंच मनोज चौधरी, राजेंद्र तुरकर, तंटामुक्त समिती अध्यक्ष रमेश वट्टी, प्रगतीशील शेतकरी मनिराम खोब्रागडे, उपसरपनच होमेंद्र तांडेकर, रवींद्र ठाकुर आदि उपस्थित होते.

यावेळी उत्कृष्ट शेती करणारे संजय ठाकरे व गगन भुरे यांचा शाल, श्रीफळ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. प्रशिक्षणात महिला बचत गटाच्या महिलांनी त्यांचे पदार्थ विकण्यासाठी स्टॉल लावले होते. संचालन एम.डी. चुचुवार यांनी केले. आभार गटविकास अधिकारी पवार यांनी मानले.

# भूयारी गटार व डम्पिंग यार्डचा प्रश्न आ.अग्रवालांनी मांडला विधानसभेत



**गोंदिया:-** महाराष्ट्र विधिम ंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात स्थानिक आमदार विनोद अग्रवाल यांनी शहरात सुरू असलेल्या भूयारी गटार योजनेच्या कामातील निष्क्रीयता, गैरप्रकार, सुरक्षेचा अभाव, डम्पिंग यार्डासह पिण्याच्या पाण्याच्या समस्येकडे सभागृहाचे लक्ष वेधले. गोंदिया नगरपालिकेच्या स्थापनेला १०० पेक्षा अधिक वर्षे झाले.मात्र कचरा व्यवस्थापन केंद्राची सुविधा झाली नाही.

शहरातील कचरा शहराबाहेर कुठेतरी मोकळ्या जागेवार टाकला जातो.कालांतराने त्याला आग लाव- ली जाते. यामुळे प्राण, वित्तहाणीचा धोका तर भेडसावतोच मात्र प्रदुषणही होते. या समस्येतून म ार्ग काढण्यासाठी शहराजवळील एका गावात डम्पिंग यार्ड उभारण्याची योजना आखण्यात आली होती, मात्र तेथील नागरिकांच्या विरोधामुळे ते काम यशस्वी होऊ शकले नाही.

आता शहराच्या एमआयडीसी परिसरात यासाठी उपाययोजनेची मागणी अग्रवालांनी सभागृहाला केली. शहराचे वसाहतीकरण झाले आहे.लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. अनेक भागात पिण्याच्या शुद्ध पाण्याची सम स्या आहे. यासाठी सादर करण्यात आलेल्या २०८ कोटींचा आराखडा मंजूर करावा, धापेवाडा प्रकल्पातू पाण्याची व्यवस्था करावी,अशी मागणीही त्यांनी केली.

शहरात भूमिगत गटर योजनेचे काम सुरू आहे. निकृष्ट दर्जाचे केले जात आहे. यामुळे नागरिकांना त्रास होत आहे.नुकतेच शहरातील मामा चौकात योजनेचे काम सुरू असताना कामावरील मजूराचा सुरक्षेच्या अभावात मृत्यू झाला. यापुर्वी निकृष्ठ कामासंदर्भात नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या, कारवाई झाली नाही. ठेकेदारावर कारवाई व्हावी, मृतकाच्या कुटुंबियांना शासनाने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी अग्रवाल यांनी सभागृहात केली. मंत्री उदय सामंत यांनी वरील सर्व मागण्यांवर लवकरच बैठक घेऊन समस्या निकाली काढण्याचे आश्वासन दिले.

## महिला बचतगट निमीत वस्तुंची विक्री व प्रदर्शनी

**गोंदिया :** ८ मार्च जागतिक महिला दिनानिमीत्त महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), कृषी विभाग व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यम ाने नव-तेजस्विनी योजनेअंतर्गत बचतगटाचा मेळावा दिनांक २३ ते २७ मार्च दरम्यान मोदी मैदान, बालाघाट टी पॉईट जवळ, गोंदिया येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या मेळाव्यात ग्रामीण व शहरी भागातील महिला बचतगट उत्पादित अनेक वस्तू विक्रीसाठी ठेवणार आहेत. सदर मेळाव्यात देवरी तालुक्यातील अतिदुर्गम भागातील मासुलकसा या गावातील महिलांद्वारे लाखेद्वारे बनविलेल्या बांगड्या, साडी पिन व अन्य वस्तू तसेच सालेकसा तालुक्यातील बांबूच्या वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

# गोंगले येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण



**सडक/अर्जुनी-** अर्जुनी/ मोरगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार म नोहर चंद्रिकापुरे यांनी शनिवारी गोंगले येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन व लोकार्पण केले. सर्वसामान्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्या लवकरच सोडविण्याचे आश्वासन त्यांनी दिले. क्षेत्राच्या विकासासाठी आ.मनोहर चंद्रिकापुरे यांच्या पाठपुराव्याने ३ कोटी १७ लाख रूपयाचा निधी मंजूर झाला असून या निधीतून विविध विकासकामे केली जाणार आहेत.

गोंगले या गावात आमदार स्थानिक विकास निधीतून छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचा व एकलव्य पुतळ्याजवळ सौंदर्यकरण, ५ लक्ष, काल्हा देव मंदिराजवळ सभागुह चा लोकार्पण १० लक्ष, ग्रामस्थांच्या मागणीवरुन बांधलेल्या अंगणवाडी खोली चा लोकार्पण १० लक्ष, प्रधानम ंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत गोंगले ते बक्कीटोला रस्ता वर पुल १ कोटी ४९ लक्ष रू लोकार्पण तसेच गोंगेले/ पैकनटोली, बक्कीटोला, भोयरटोला येथे जल जीवन मिशन अंतर्गत १ कोटी ४३ लक्ष रुपयाच्या नळ पाणी पुरवठा योजनेचा भूमिपूजन केला.

भूमिपूजन कार्यक्रमाला संबोधित करताना आ.मनोहर चंद्रिकापुरे यांनी ग्रामपंचायत गोंगले यांचे कौतुक केले. गावात विविध बांधकामे केल्यास गावकऱ्यांची व परिसरातील नागरिकांना सोय होणार असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रंसगी जिल्हा परिषद सदस्या सुधाताई रहांगडाले, सरपंच शामकला करचाल, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महासचिव डी.यू. रहांगडाले, माजी सरपंच विश्वनाथ रहांगडाले, मोरेश्वर राऊत, भोजराज रहांगडाले, तुळशीराम बिसेन, माणिकचंद रहांगडाले, संगीता रहांगडाले, मदन येळे, आशा कृपान, मनीषा कृपाले, नरेश केवट, बालू गजबे, उषाताई रहांगडाले, साहिल बीसेन, प्रशांत येळे, शैशराम पटले, प्रमिला वैद्य, विमला भेलावे, तसेच ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

# राज्यातील शाळांमध्ये आता नवा पोषण आहार



**गोंदिया:** राज्यातील शाळांमध्ये पोषण आहार म्हणून दिल्या जाणाऱ्या खिडीपासून आता विद्यार्थ्यांची सूटका होण्याची चिन्हे आहेत. पोषण आहारामध्ये स्थनिक अन्नपदार्थ, तृणधान्य, अन्य पदाथार्चा समावेश करून आहाराचा दर्जा आणि पौष्किता वाढवण्यासाठी, सध्याच्या पाककृतीमध्ये सुधारणा सुचवण्यासाठी तज्जांची समिती नियुक्ती करण्यात आली. शिक्षण, हॉटेल, संशोधन, आरोग्य क्षेत्रा-तील तज्जांचा समितीमध्ये समावेश आहे.

शालेय शिक्षण विभागाने या संदभातील शासन निर्णय प्रसिध्द केला. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहाराच्या पाककृतीची निश्चिती २०११ मध्ये करण्यात आली आहे. मात्र गेल्या काही वर्षात प्रसिध्द झालेल्या अहवालातून विद्यार्थ्यांचा बॉडी मास कमी जास्त असणे, विद्यार्थ्यांच्या शरीरामध्ये लोहाचे प्रमाण कमी जास्त असणे आदी बाबी निदर्शनास आल्या आहेत. तसेच केंद्र शासनाने स्थानिक उपलब्ध होणाऱ्या स्थानिक अन्नपदार्थ, तृणधान्य, अन्य पदार्थांचा समावेश करण्याचा शक्यता पडताळून पाहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी आरोग्य, आहार,शिक्षण क्षेत्रातील तज्जांची समिती नियुक्ती करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण संचालकांच्या अध्यक्षतेखालील या समितीमध्ये ज्येष्ठ शेष विष्णू मनोहर, कोल्हापूर हॉटेल मालक संघाचे अध्यक्ष उज्जवल नागेश्वर, आघारकर संशोधन संस्थेतील प्रसाद कुलकणी, आहारतज्ज पूनम कदम, व्यापारी महासंघाचे कार्यवाह नितीन वाळके, पो-षणतज्ज डॉ.अर्चना ठोंबरे, महाराष्ट्र हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी संस्थेतील प्रतिनिधी, पोषणशक्ती निर्माण योजनेचे अधिक्षक वैभव बोरकर, राज्य समन्वय अधिकारी देविदास कुलाळ यांचा समावेश आहे.



# ओबीसींचे वसतिगृह व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांसाठीच!



**गोंदिया:** ओबीसी समाजाच्या रेट्यानंतर राज्य सरकारने ओबीसी, व्हीजेएनटी आणि विशेष मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी जिल्हानिहाय वसतिगृह सुरू करण्याचा निर्णय घेतला. मात्र, ही वसतिगृहे केवळ व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांसाठी असतील, अशी अट घालण्यात आली आहे. यामध्ये इयत्ता अकरावी, बारावी तसेच बीए-स्सी, बी.ए., बी.कॉम. यासारख्या गैरव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांना प्रवेश नसल्याने विद्यार्थ्यांकडून रोष व्यक्त होत आहे.

राज्य सरकारच्या इतर मागास बहुजन कल्याण खात्याने जिल्हानिहाय वसतिगृहे सुरू करण्याची कार्यपद्धती आणि नियमावली तयार केली आहे. यापूर्वी राज्य सरकारने २८ फेब्रुवारी २०२३ ला स्वत: वसतिगृहासाठी इमारत भाड्याने घेऊन संचालित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यात १०० मुले व १०० मुली एवढी संख्या असलेले प्रत्येकी दोन वसतिगृह भाड्याने घेतले जाणार आहेत. राज्यातील ३६ जिल्ह्यांसाठी एकूण ७२ वसतिगृहे सुरू केली जाणार आहेत. परंतु, ही वसतिगृहे मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असणार आहेत. याचा अर्थ इयत्ता अकरावी कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना तसेच बीए, बीएस्सी, बीकॉम, एमए, एमएस्सी, एमकॉमच्या विद्यार्थ्यांना या वसतिगृहात प्रवेश दिला जाणार नाही.

गावखेड्यात किंवा तालुक्याच्या गावी अकरावी, बारावी किंवा त्यापुढील शिक्षण उपलब्ध नसल्याने हजारो विद्यार्थी जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा मोठ्या शहरात शिक्षण घेण्यासाठी येत असतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन सामाजिक न्याय आणि आदिवासी विकास खात्याने सर्व प्रकारचे शिक्षण घेणाऱ्यांसाठी सरसकट वसतिगृहे उपलब्ध केली. सामाजिक न्याय खात्याने तर वसतिगृहात जागा न मिळाल्यास आर्थिक सहाय्य करणारी स्वाधार योजना देखील सुरू केली आहे. मात्र, ओबीसींसाठी अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर स्वतंत्र वसतिगृह सुरू होत असतानाही केवळ व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांना त्यात प्रवेश दिला जाणार आहे. मग गैरव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

### शासनाने जबाबदारी टाळू नये

**अनेक गावांमध्ये दहावीनंतरचे शिक्षण उपलब्ध नसते. शेकडो विद्यार्थी गैरव्यावसायिक शिक्षण सुरू असताना स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असतात. या विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध करून देणे शासनाची जबाबदारी आहे. व्यावसायिक आणि गैरव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांना वसतिगृहात प्रवेश दिला गेला पाहिजे.**

**-उमेश कोर्राम अध्यक्ष ओबीसी युवा अधिकार मंच.**

**व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांबरोबरच गैरव्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यांनाही वसतिगृहात प्रवेश देण्याबाबत सुधारित "जीआर' काढण्याची सूचना अधिकाऱ्यांना देण्यात येईल.-**

**अतुल सावे, मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण.**

# १२७ आदिवासी तरुण-तरुणी बांधणार रेशीमगाठ



**गडचिरोली:-** गडचिरोली पोलिस दल पोलिस दादालोरा खिडकी आणि मैत्री परिवार संस्था नागपूर व गडचिरोली शाखेच्या संयुक्त विद्यमाने येत्या २६ मार्च रोजी चंद्रपूर मार्गावरील अभिनलच्या पटांगणावर सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या विवाह सोहळ्यात आत्मसर्मपण केलेल्या ८ नक्षल्यांसह दुर्गम भागातील १२७ आदिवासी तरुण-तरुणींचा विवाह लावून देण्यात येणार असल्याची माहिती पोलिस अधीक्षक निलोत्पल व मैत्री परिवार संस्थेचे अध्यक्ष संजय भेंडे यांनी शुक्रवार, १७ मार्च रोजी घेतलेल्या पत्रपरिषदेत दिली.

पोलिस दादालोरा खिडी मागील अनेक वर्षापासून जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम राबवित आहे. आदिवासी बांधवांची भयग्रस्त वातावरणातून मुक्तता करणे तसेच त्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केल्या जात आहे. सामुहिक विवाह सोहळा देखील त्याच श्रृंखलेतील एक उपक्रम आहे. मैत्री परिवारातर्फे २०१५ ला नागपूर येथील सामुहिक विवाह सोहळ्याला सुरुवात करण्यात आली. दरम्यान, आत्मसर्मपित व आदिवासी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने २०१८ पासून गडचिरोली जिल्ह्यात हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

मैत्री परिवार संस्था दीड दशकापासून सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य आणि पर्यावरण क्षेत्रात कार्यरत आहे. मैत्री परिवाराने गडचिरोली जिल्हा दत्तक घेतला असून, पोलिस विभागाच्या मदतीने जिल्ह्यातील विविध भागात दीपावली सण साजरा करण्यासोबतच कपडे वाटप, वैद्यकीय शिबिरे, शैक्षणिक उपक्रम, रोजगार मेळावे राबविले जात आहेत. २०१८ साली पहिल्यांदा सामूहिक विवाह सोहळा घेण्यात आला. यापूर्वी नागपूर व अहेरी येथे प्रत्येकी एक गडचिरोली येथे दोन सामूहिक विवाह सोहळे पार पाडण्यात आले. आतापर्यंत १५ आत्मसमर्पित नक्षल जोडप्यांसह एकूण ४३३ आदिवासी युवक-युवतींचे विवाह पार पडले आहे.

येत्या २६ मार्च रोजी आयोजित विवाह सोहळ्याला गडचिरोली व नागपूर येथील अनेक मान्यवर, गडचिरोली पोलिस दलाचे अधिकारी आणि मैत्री परिवाराचे पदाधिकारी उपस्थित राहणार असून जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही या उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आल्याची माहिती पोलिस अधीक्षक व मैत्री संस्थेच्या पदाधिकारी दिली. यामध्ये सहभागी ८ नक्षल्यांची नावे सुरक्षितेच्या दृष्टीकोणातून उघड करण्यात आले नसून सर्व जोडप्यांना सोन्याचे एक डोरले व संसारोपयोगी साहित्य देण्यात आहे.

दानशुर व्यक्तींनी प्रत्येकी एका जोडप्याचे पालकत्व स्वीकारून ३० हजार रुपयांपर्यंतचा खर्च करू शकणार असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. यावर्षीचा विवाह सोहळा अधिक शानदार आणि भव्य व्हावा, यासाठी पोलिस विभाग व मैत्री परिवार संस्थेचे कार्यकर्ते सर्मपित भावनेने कार्य करीत आहेत. पत्रपरिषदेला पोलिस अधीक्षक निलोत्पल, मैत्री परिवार संस्थेचे अध्यक्ष संजय भंडे, सचिव प्रमोद पेंडके यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# लोधी समाजाचा केंद्राच्या ओबीसी यादीत समावेश करा

**आमगाव:-** महाराष्ट्रातील लोधी समाजाचा केंद्र सरकारच्या इतर मागास वर्गीय यादीत समावेश करुन सुविधा उपलब्ध कराव्यात, अशी मागणी माजी आ. भेरसिंग नागपुरे यांनी खासदार तथा राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांना निवेदनातून केली. निवेदनानुसार,



महाराष्ट्रातील लोधी समाजातील लोक सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात खूप मागासलेले आहेत. महाराष्ट्रा शासनाने सन २०१५ पासून या समाजाचा इतर मागास प्रवर्गात समावेश करून सार्वजनिक सुविधा उपलब्ध कौन दिल्या आहेत. मात्र केंद्र सरकारच्या इतर मागासवर्गी यांच्या यादीत महाराष्ट्रातील लोधी समाजाचा समावेश नाही. त्यामुळे केंद्र सरकारच्या कोणत्याही योजनेचा लाभ लोधी समाजाला मिळत नाही.

महाराष्ट्रातील लोधी समाजातील शिक्षित व्यक्तींना केंद्र सरकारच्या कोणत्याही विभागातील नोकरीच्या संबंधात मागासवर्गीय लोकांसाठी राखीव असलेल्या नोकऱ्यांमध्ये स्वीकारले जात नाही. यामुळे समाजातील सुशिक्षित तरुण वर्गावर अन्याय होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाकडे अर्ज करून (यादीत प्रवेश केल्यानंतर) लोधी समाजाचा केंद्रात आणखी एक वर्ग म्हणून समावेश करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र आजपर्यंत निर्णय झालेला नाही. केंद्रसरकारने महाराष्ट्रातील लोधी समाजाचा इतर मागासवर्गीय प्रवर्गात समावेश करून सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाकडून योग्य ती कार्यवाही करून या समाजाला न्याय द्यावा. अशी मागणी निवेदनात माजी आ.भेरसिंग नागपुरे यांनी केली आहे.

# महाराष्ट्र एक्सप्रेस "या" दिवशी रद्द

**गोंदिया:** सोलापूर विभागात रेल्वे लाईन आणि यार्ड रिमॉडेलिंगच्या दुरुस्तीच्या काममुळे, २६ ते २९ मार्चदरम्यान गोंदिया ते कोल्हापूर आणि कोल्हापूर ते गोंदिया महाराष्ट्र एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. सोलापूर विभागातील मनमाड, दौंड विभाग, बेलापूर, चितळी, पुणतांबा येथे २६ ते २८ मार्च रोजी दुहेरी लाईन यार्डच्या रीमॉडेलिंग कामामुळे मेगाब्लॉक असणार आहे. या कालावधीत महाराष्ट्र एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. काही गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

२६ आणि २७ मार्च रोजी कोल्हापूरहून सुटणारी कोल्हापूर-गोंदिया महाराष्ट्र एक्सप्रेस (११०३९) रद्द करण्यात आली आहे. तसेच गोंदिया-कोल्हापूर महाराष्ट्र एक्सप्रेस (११०४०) २८ आणि २९ मार्च रोजी रद्द करण्यात आली आहे. तसेच गोंदिया मार्गावर धावणारी पुणे-हटिया एक्सप्रेस (२२८४५) आणि पुणे-हावडा एक्स्प्रेस (१२१२९) सिकंदराबाद-बल्लारशाह-नागपूर मार्गावर धावणार नाही.

हावडा येथून सुटणारी हावडा-पुणे एक्स्प्रेस (१२१३०) २५ आणि २६ मार्च रोजी नागपूर-बल्लारशाह -सिकंदराबाद-वाडी-दौंड मार्गावर धावेल. त्यामुळे गोंदिया - नागपूर स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागणार आहे.

# देसाईगंजचे ठाणेदार महेश मेश्राम यांची उचलबांगडी



**देसाईगंज :-** मागील सहा महिन्यांपासून या ना त्या कारणाने सतत वादग्रस्त ठरलेले देसाईगंजचे ठाणेदार महेश मेश्राम यांची पोलीस अधीक्षक निलोत्पल यांनी तातडीने उचलबांगडी करून सध्या देसाईगंज पोलीस स्टेशन चा प्रभार किरण रासकर यांच्या कडे देण्यात आले असल्याचे सांगितले जात आहे.

मागील साडे पाच वर्षांत सहाही प्रभारी अधिकारी यांच्या कारभारावर वरिष्ठ अधिकारी संतुष्ट नसल्याने गडचिरोली मुख्यालयात जमा व्हावे लागले होते. ३० मार्च २०२१ पुवी दोन वर्ष सहायक पोलीस निरिक्षकाच्या भरवशावर होते. त्यानंतर देसाईगंज पोलीस स्टेशन मध्ये पुन्हा नियमित पोलीस निरिक्षकांनी पदभार ग्रहण केल्यानंतर अवघ्या सहा महिन्यातच त्यांनाही पोलीस मुख्यालयात जमा करण्यात आले. त्यांच्या ठिकाणी गडचिरोलीवरुन पोलीस निरीक्षक महेश मेश्राम यांची प्रशासकिय कारणास्तव ३१ ऑगस्ट २०२१ ला देसाईगंज पोलीस स्टेशन मध्ये यांची बदली करण्यात आले आहे.

यातील मागील एक वर्ष कोरोणा विषाणूंच्या आपत्ती व साथरोग व्यवस्थापनात गेला असला, तरी नजीकच्या सहा महिन्यांपासून देसाईगंज पोलीस स्टेशनला भंडारा, गोंदिया व चंद्रपुर जिल्ह्याच्या सिमा लागुनच असुन गडचिरोली जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजारपेठ म्हणुन ओळखल्या जाते.

अवैद्य दारू विक्री व्यवसाय, सट्टापटी, कोंबड बाजार,हॉय प्रोफाईल गुन्हेगारीचे केंद्र आहे. मागच्या सहा महिन्यांत ११ ऑक्टोबर २०२२ ला आशिष मेश्राम याचा तर ६ डिसेंबर २०२२ ला करण कोवे याचा निघृण खून झाला होता. या दोन्ही घटना देसाईगंज शहराच्या हद्दीत घडल्या हे विशेष. त्यामुळे देसाईगंज पोलीसांचे गुन्हेगारांवर भिती राहिली नसल्याचे बोलले जात असुन शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

देसाईगंज तालुक्यासह संपूर्ण शहरात जागोजागी अवैद्य दारू व्यावसायिकांनी परवानेच असल्यासारखे बेधडक खुलेआम दारू विक्री करित असुन एकही मोठी कारवाई झाली नसून मुख्य बाजार विभागात किराणा दूकानासारखे जागोजागी अवैद्य सट्टा बाजार शूरू आहे. तालुक्यासह देसाईगंज शहरातील मुख्य बाजारात सट्टा पट्टीचे जाळे पसरविले असुन अजगरी विळख्यात अडकलेला आहे.

# अश्लील चित्रफित दाखवत शिक्षकाकडून विद्यार्थिनीचा लैंगिक छळ

**गोंदिया :** इयत्ता नवव्या वर्गातील विद्यार्थिनीला शाळेतील शिक्षक मोबाइलमधील अश्लील चित्रफिती दाखवून लैंगिक छळ करत असल्याचा धक्कादायक प्रकार गोंदिया जिल्ह्यात समोर आला आहे. काही दिवसापुवीच गोंदिया तालुक्यातील एका शाळेच्या शिक्षकाने विद्यार्थिनीची छेड काढत अश्लील चाळे केल्याबद्दल आरोपींची कारागृहात रवानगी करण्यात आली होती. हे प्रकरण ताजे असतानाच आता अर्जुनी मोरगाव तालुक्यात घटना उघडकीस आली आहे. त्यामुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. अर्जुनी मोरगाव तालुक्यातील वडेगाव स्टेशन येथील विद्यालयात घडलेल्या या घटनेत हेमंतकुमार गुलाराम येरणे (३५,रा. इसापूर) असे आरोपी शिक्षकाचे नाव आहे.त्यास अटक करण्यात आली आहे.विशेष सत्र न्यायालयाने २८ मार्चपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.आरोपी शिक्षक हा पीडित विद्यार्थिनी व तिच्या मैत्रिणीं सोबत आक्षेपार्ह वर्तन करायचा.कपडे ओढून आपल्या कक्षात बोलवायचा.एकांतात मोबाइलमध्ये अश्लील चित्रफिती दाखवायचा.लैंगिक छळ करून त्याची लैंगिक इच्छा असल्याचे पीडितेने अर्जुनी मोर पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या बयानात सांगितले.पोलिसांनी बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

# समाजहिताकरीता गटतट विसरुन एकत्र येण्याची गरज-पंकज रहांगडाले

## ■ राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्यावतीने गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील जि.प.प.सदस्यांचा सत्कार
## ■ सामाजिक एकतेकरीता एकजुटता आवश्यक-राष्ट्रीय अध्यक्ष इंजि.टेंभरे







**तिरोडा:** एकजूट ही प्रत्येक समाजाची ताकद आहे. एकजुटीने सर्व समस्यांची सोडवणूक होऊ शकते. ही एकजुटता हुशार विद्यार्थ्यांना सहकार्य करण्यासाठी कामात आणावी, त्यांच्या पाठीशी उभे राहावे, असे आवाहन राष्ट्रीय पंवार क्षत्रिय (पवार, पोवार, भोयर पवार, परमार) महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि.मुरलीधर टेंभरे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्यावतीने गेल्या पाच वर्षात पार पडलेल्या महाधिवेशनासह इतर अधिवेशनातील प्रस्तावांवर सकारात्मक चर्चा करुन समाज एकीकरणावर भर देण्यात आले. तिरोडा तालुक्यातील मेंढा येथे १९ मार्च रोजी राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेच्यावतीने आयोजित चिंतन बैठक व नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींच्या सत्कार कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. यावेळी समाजभवन व राजाभोज स्मारकाकरीता जमिन दान करणाऱ्या दानदात्यांचाही सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार हेमंत पटले, गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले, गोंदिया जिल्हा परिषदेचे सभापती संजय टेंभरे, भंडारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष रमेश पारधी, राष्ट्रीय पवार क्षत्रिय महासभेचे उपाध्यक्ष उमेश देशमुख, अशोक बिसेन, संघटन सचिव खेमेंद्र कटरे, कोषाध्यक्ष दिलीप रहांगडाले, माजी अधिष्ठाता गौरीशंकर टेंभरे, सदस्य अर्पण बिसेन, हरकचंद टेंभरे, एड.रुपेंद्र कटरे, जनसवांद सहसचिव डॉ.संजिव रहांगडाले, गोंदिया पवार प्रगतीशील मंचचे अध्यक्ष एड.पी.सी.चव्हाण, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष राधेलाल पटले, प्राचार्य एस.एस.भैरम, राजहरिणखेडे, गोंदिया पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले, विश्वजीत फुंडे, चेतन भैरम, लालू कटरे, गोंदिया पवार महिला समिती अध्यक्ष इशा गौतम आर्दी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमात सामाजिक व सांस्कृतिक ऐक्य टिकवून ठेवण्यासोबतच समाजात नवनव्या येत असलेल्या कुरीतीवर आळा घालण्यासोबतच मांगलिक कार्यात वेळेचे भान व महिलांचा सन्मान कसा कायम ठेवता येईल यावर उपस्थितांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी सामाजिक ऐक्याकरीता सर्वांनी राजकीय पक्षभेद व गटतट विसरुन एकत्र काम करण्याची गरज असल्याचे विचार गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी सत्कारमुर्तीच्यावतीने विचार व्यक्त केले. मान्यवरांनी समाजाची बोलीभाषा टिकविण्यासोबत समाजाच्या चालीरिती जोपासणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला जिल्हा परिषद सदस्य डॉ.लक्ष्मण भगत, प्रविण पटले, चतुर्भूज बिसेन, संशेद्र भगत, सौ.विमल कटरे, एड.माधुरी रहांगडाले, सुधा रहांगडाले, अश्विनी पटले, यांच्यासह पंचायत समिती सदस्य अजाबराव रिनायत, सौ.जितेश्वरी रहांगडाले, चित्रलेखा चौधरी, शशीबाई कटरे, शंकरलाल टेंभरे, वंदना पटले, श्रीमती तोमेश्वरी कटरे, ओमप्रकाश कटरे, किशोर पारधी, सौ.शिला बिसेन, चेतलाल भगत, तेजराम चव्हाण, सौ.विनाताई कटरे आदी गोंदिया-भंडारा जिल्ह्यातील जि.प.व पं.स.सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता राजाभोज समिती मेंढा येथील सर्व पदाधिकारी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला तुमसर, भंडारा, सिहोरा, कालीमाटी, तिल्ली-मोहगाव, फुलचूर, शिवनी, कुऱ्हाडी, रजेगाव, भानपूर, दवनीवाडा, एकोडी आदि गावातील समाज संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



















